रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ४७
www.ramprahar.com

◆ बुधवार, २ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

रोह्याचे माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे शिवसेनेत/२

भाजपतर्फे अलिबाग आणि पालीमध्ये दहीहंडी उत्सव/५

रणजी ट्रॉफीसाठी मुंबईची धुरा सिद्धेश लाडकडे/८

## युवा पिढीला विकसित भारत सुपूर्द करायचाय -पीएम मोदी



**नवी दिल्ली :** जग चौफेर संकटात असताना भारताने वेगाने प्रगती केली आहे. जगभरात कोरोनाने विस्कळीत झालेली व्यवस्था असूनही स्थिर झालेली नाही. अशा प्रतिकूल वातावरणात देशाने अर्थव्यवस्था वाढीची नवी उंची गाठली आहे. हा वेग कायम ठेवायचा असून विकसित भारत पुढील पिढीच्या हाती सोपवायचा आहे, असा दृढ विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. भारताच्या जीडीपीने ७.८ टक्क्यांची वाढ नोंदवल्यानंतर पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या. सोशल मीडियावर रील शेअर करून देशाला संदेश देत काँग्रेसला खोचक टोला लगावला. 'झूंठ की गुंज' सगळीकडे निराशा पसरवण्याचे काम करीत आहे. या सगळ्या गोष्टींवर मात करून निराशाजनक गोष्टींना बाजूला सारून देशाने ७.८ टक्के वाढ शक्य करून दाखवली आहे, असे ते म्हणाले.

# जमीन सर्च रिपोर्ट आता एका क्लिकवर!

### राज्यात महाभूमी स्टॅक डिजिटल प्रणालीचा शुभारंभ



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील जमीन व्यवहार अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी महसूल व वन विभागाने महाभूमी स्टॅक ही एकात्मिक डिजिटल प्रणाली सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला. या माध्यमातून जमिनीच्या मालकी हक्कापासून व्यवहार आणि न्यायालयीन प्रकरणांपर्यंतची माहिती एका क्लिकवर मिळणार आहे.

सध्या महाभूलेख, महाभूनकाशा आणि आयडीआरएस यांसारख्या वेगवेगळ्या प्रणालींवर उपलब्ध असलेली माहिती आता एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर मिळणार आहे. ग्रामीण भागात गट क्रमांक, तर शहरी भागात सीटीएस/सिटी सर्व्हे क्रमांक टाकून संबंधित भूखंडाची माहिती शोधता येईल. या प्रणालीच्या शुभारंभावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि विविध खात्यांचे मंत्री उपस्थित होते.

या प्रणालीमध्ये ३.५ कोटींहून अधिक ७/१२ आणि ८-अ अभिलेख, १.५ कोटींहून अधिक भूनकाशे आणि मिळकत पत्रिका तसेच ४० कोटींहून अधिक जुने फेरफार व अभिलेख उपलब्ध आहेत. जमीन खरेदीपूर्वी नागरिकांना संबंधित भूखंडाचा सध्याचा वापरकर्ता, बोजे, मागील फेरफार, नोंदणीकृत व्यवहार आणि न्यायालयीन प्रकरणांची स्थिती तपासता येणार आहे. त्यामुळे फसवणुकीला आळा बसण्यासोबतच मध्यस्थांवरील अवलंबित्व कमी होणार आहे.

७/१२, ८-अ, नकाशा, फेरफार स्थिती, मोजणी अर्ज आणि दस्त शोध यांसारख्या विविध सेवाही एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने नागरिकांचा वेळ, श्रम आणि खर्च वाचणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाभूमी स्टॅकमुळे गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. भविष्यात या प्रणालीमध्ये जीआयएस, एआय आधारित शोध सुविधा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रणालींचे एकात्मीकरण करण्याचेदेखील नियोजन आहे.

## सुटे खाद्यतेल विक्रीस वर्षभराची मुदतवाढ



**मुंबई : प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) घेतलेल्या निर्णयामुळे अडचणीत आलेल्या सुट्या तेलाच्या व्यापाऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत मंगळवारी (दि.१) झालेल्या शिष्टमंडळाच्या बैठकीनंतर राज्य सरकारने सुटे खाद्यतेल विकण्यासाठी व्यापाऱ्यांना आणखी एका वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे, मात्र ही अंतिम मुदत असून त्यानंतर कोणतीही वाढ दिली जाणार नाही, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला आहे.

एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सूत्रे हाती घेतल्यापासून अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी धडक मोहिमा राबवल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर त्यांनी काही दिवसांपूर्वी सुट्या तेलाच्या विक्रीवर प्रतिबंध आणत तेल विक्री करताना कंपन्यांना नियमांचे पालन करणे बंधनकारक केले होते, मात्र या निर्णयामुळे हजारो छोटे व्यावसायिक आणि पारंपरिक व्यापाऱ्यांसमोर उपजीविकेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर सुटे तेल विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सुट्या तेलाच्या विक्रीस एक वर्षाची मुदतवाढ जाहीर केली.

यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, सन २०११च्या कायद्यानुसार अन्न सुरक्षेत गुणवत्ता हा महत्त्वाचा निकष असला तरी अनेक गरीब आणि सर्वसामान्य नागरिक आजही सुटे तेल खरेदी करतात. त्यामुळे कायदा आणि सामान्य माणसाचे हित या दोन्ही गोष्टींचा समतोल साधत सुवर्णमध्य काढणे आवश्यक आहे. कायद्याचे पालन करताना पारंपरिक व्यावसायिकांना आपल्या व्यवसायात कोणकोणते अनुकूल बदल करावे लागतील याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी एफडीए आणि व्यापाऱ्यांची मिळून एक संयुक्त समिती गठीत केली जाईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## अलिबागच्या जिल्हा रुग्णालयात स्लॅब कोसळून रुग्ण जखमी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णाच्या अंगावर स्लॅबचा काही भाग कोसळून तो जखमी झाल्याची घटना मंगळवारी (दि.१) घडली. या घटनेमुळे जिल्हा रुग्णालयातील आंतररुग्ण विभागाच्या दुरवस्थेचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला आहे.

सुनील आवरे असे जखमी रुग्णाचे नाव आहे. पहाटे तीनच्या सुमारास त्याच्या डोक्यावर स्लॅबचा काही भाग अचानक कोसळला. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी तातडीने त्याच्यावर उपचार केले.

जिल्हा रुग्णालयाची इमारत ४० वर्षे झाल्याने जीर्ण झाली आहे. नवीन इमारतीचे बांधकाम सुरू झाले असले तरी इमारत पूर्ण होण्यासाठी किमान दोन वर्षांचा कालावधी लागणार आहे, मात्र तोवर हीच जीर्ण आणि नादुरूस्त इमारत रुग्णांवरील उपचारासाठी वापरावी लागत आहे. त्यामुळे इमारतीला गळती लागणे, स्लॅब कोसळणे, पीओपी कोसळणे यांसारख्या घटना सातत्याने घडत आहेत.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी स्लॅबचा भाग कोसळल्याची घटना घडल्याचे मान्य केले. इमारतीच्या दुरूस्तीसाठी बांधकाम विभागाला प्रस्ताव दिला असल्याचेही त्यांनी सांगितले.

## कामोठ्यातील 'एल.के. विवांता'च्या अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर २२ येथील प्लॉट क्रमांक ७३/७४वर असलेल्या एल.के. विवांता या इमारतीमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत वाढीव बांधकामावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, स्थायी समिती सभापती बबन मुकादम आणि माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेऊन या गंभीर प्रकरणाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

### मनपा लोकप्रतिनिधींची आयुक्तांकडे मागणी

कामोठे से. २२ येथील प्लॉट क्र. ७३/७४वर मे.एल.के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीकडून एल.के. विवांता इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या इमारतीसाठी महापालिका प्रशासनाकडून केवळ ११ मजल्यांची अधिकृत बांधकाम परवानगी देण्यात आली असताना प्रत्यक्षात मात्र १५ मजल्यांचे बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. अधिकृत परवानगीपेक्षा वाढीव चार मजल्यांचे बांधकाम करण्यात आल्याने या बांधकामाच्या वैधतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे वाढीव मजल्यांसाठी आवश्यक



असलेला अतिरिक्त एफएसआय मंजूर नसतानाही हे बांधकाम करण्यात आल्याचे समोर आले आहे. संबंधित विकसकाने वाढीव बांधकाम नियमित अथवा मंजूर करून घेण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाकडे दोन वेळा प्रस्ताव सादर केले होते, मात्र दोन्ही प्रस्ताव महापालिका प्रशासनाने फेटाळून लावले आहेत. असे असतानाही वाढीव बांधकाम करून संबंधित विकसकाने नियमांचे उल्लंघन केल्याचा मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला.

**पोलिसांत गुन्हा दाखल**

पाच महिन्यांपूर्वी अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासंदर्भात सूचना करण्यात आल्या होत्या. प्रशासकीय कामकाजानुसार या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रभाग अधिकाऱ्यांच्या तक्रारीनुसार मे.एल.के. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या आदेशानुसार पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाने केलेल्या प्राथमिक कार्यवाहीनंतर आता प्रत्यक्ष अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे आवश्यक असल्याचे महापौर नितीन पाटील व नगरसेवक परेश ठाकूर यांनी स्पष्ट केले. पोलिसांत तक्रार दाखल झाल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून २१ ऑगस्ट रोजी कारवाई प्रस्तावित करण्यात आली होती, मात्र तक्रार दाखल होऊनही प्रत्यक्ष कारवाईला विलंब होत असल्याने या विलंबाबाबत महापौर पाटील व नगरसेवक ठाकूर यांनी आयुक्त मंगेश चितळे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत प्रशासनाचे लक्ष वेधले. **(पान २ वर..)**

## निवडक

### एमपीएससी पेपरफुटीप्रकरणी ऋतुजा पाटीलला अटक

**नंदुरबार :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या औषध निरीक्षकपदाच्या पेपरफुटी प्रकरणातील मुख्य आरोपी ऋतुजा पाटील हिला मुंबई पोलिसांच्या पथकाने नंदुरबारमधून अटक केली आहे. तक्रारदार गौरव पाटील आणि ऋतुजा यांच्या प्रेमसंबंधातून हा पेपर फुटल्याचे सांगितले जाते. पोलिसांनी गौरवला अटक केल्यानंतर आता ऋतुजालाही अटक केली आहे. त्यामुळे या प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची संख्या सात झाली आहे.

### विद्यार्थी आंदोलनांशी संबंधित एफआयआर रद्द

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटीप्रकरणी दिल्लीसह देशात झालेल्या निदर्शनाप्रकरणी पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले होते. हे सर्व एफआयआर मागे घेण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. या निर्णयानंतर कॉक्रोच जनता पक्षाने (सीजेपी) ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत नियोजित असलेला आपला मोर्चा स्थगित केला आहे.

## अभिनंदन अन् शुभेच्छा!



**पनवेल : भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या ठाणे व नवी मुंबई विभागीय प्रमुखपदी सक्रिय कार्यकर्ते मन्सूर पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी पटेल यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. (वृत्त पान २ वर..)**




## अपघात रोखण्यासाठी ब्लॅक स्पॉट अ‍ॅप

### ■ गणेशोत्सवात प्रवासादरम्यान मिळणार पूर्वसूचना



**रायगड : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-पुणे, मुंबई-गोवा तसेच कोकणाकडे जाणाऱ्या महामार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढणार आहे. गणेशभक्त, चाकरमानी आणि वाहनचालकांचा प्रवास अधिक सुरक्षित व अपघातमुक्त व्हावा यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या वतीने ब्लॅक स्पॉट आरटीओ पनवेल हे विशेष मोबाइल अ‍ॅप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. या अ‍ॅपचा प्रवासापूर्वी वापर करण्याचे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

या अ‍ॅपच्या माध्यमातून महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणे अर्थात ब्लॅक स्पॉट, धोकादायक वळणे आणि संभाव्य धोकादायक क्षेत्रांची माहिती वाहनचालकांना आधीच मिळणार आहे. संबंधित ठिकाण जवळ येताच चालकाला अलर्ट मिळत असल्याने वाहनाचा वेग कमी करून आवश्यक ती खबरदारी घेणे शक्य होणार आहे.

गणेशोत्सवाच्या काळात महामार्गावर होणारी गर्दी लक्षात घेता वाहनचालकांनी वेग मर्यादित ठेवावा, धोकादायक ओव्हरटेकिंग टाळावे, चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्ट, तर दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा अनिवार्यपणे वापर करावा. मद्यपान किंवा अमली पदार्थांचे सेवन करून वाहन चालवू नये तसेच थकवा किंवा झोप येत असल्यास सुरक्षित ठिकाणी वाहन थांबवून पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरच पुढील प्रवास करावा, असेही आरटीओकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

बाप्पाच्या आगमनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी सुरक्षित वाहन चालवा व कुटुंबासह सुरक्षित घरी पोहचा, असा संदेश प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या वतीने देण्यात आला आहे.

ब्लॅक स्पॉट आरटीओ पनवेल अ‍ॅप अ‍ॅण्ड्राईड (गुगल प्ले स्टोअर) तसेच आयओएस (अ‍ॅप्पल अ‍ॅप स्टोअर) या प्लॅटफॉर्मवर मोफत उपलब्ध आहे. वाहनचालकांनी प्रवासाला सुरुवात करण्यापूर्वी हे अ‍ॅप मोबाइलमध्ये डाऊनलोड करून त्याचा वापर करावा. त्यासाठी Black Spot RTO Panvel Google Play Store (https://reference-url-citation.invalid/०) ही लिंक आहे.

## अमित ठाकरेंच्या निषेधार्थ मुंबईत भाजयुमोचे आंदोलन

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यातील शासकीय महाविद्यालयातील पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो हटवल्यानंतर या प्रकरणाचे पडसाद मंगळवारी (दि.१) मुंबईतही उमटले. अमित ठाकरे यांच्या निषेधार्थ भारतीय जनता युवा मोर्चाने माहिममध्ये आंदोलनाची हाक दिली होती. त्यावेळी मनसेच्या कार्यकर्त्यांनीही जमा होत गोंधळ घातला.

भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी अमित ठाकरेंच्या भूमिकेवर टीका केली तसेच माहिमच्या गंगाविहार हॉटेलजवळ जमलेल्या भाजयुमोच्या कार्यकर्त्यांवर मनसे कार्यकर्त्यांनी हल्ला केल्याचा गंभीर आरोपही महाडिक यांनी केला आहे.

# हार्बर मार्गाचा बोरीवलीपर्यंत होणार विस्तार; ८९८ कोटींची निविदा प्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईची लाईफलाईन असलेल्या लोकलने दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी समोर आली आहे. पश्चिम रेल्वेने हार्बर रेल्वे मार्गाचा गोरेगाववरून थेट बोरीवलीपर्यंत विस्तार करण्याचा निर्णय घेतला असून या प्रकल्पासाठी अखेर निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



या प्रकल्पासाठी सध्या रेल्वेकडे आवश्यक असलेली जागा उपलब्ध असल्याने प्रत्यक्ष कामाला वेगाने गती देण्यात आली आहे. एकूण ८९८ कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असणार आहे.हा विस्तार प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना बोरीवलीवरून थेट छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि रायगड जिल्ह्यात पनवेलसाठी थेट लोकल ट्रेनने प्रवास करणे शक्य होणार आहे.

यामुळे पश्चिम रेल्वेच्या मुख्य मार्गावरील गर्दीचा ताण लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होणार असून नवी मुंबई आणि दक्षिण मुंबईला जोडणाऱ्या या थेट सेवेमुळे बोरीवली व उत्तर मुंबईतील नागरिकांना मोठा कायमस्वरूपी दिलासा मिळणार आहे. दरम्यान, लवकरच पनवेल कर्जत लोकल रेल्वे प्रवासी सेवा सुरु होणार असल्याने पनवेल येथून थेट बोरिवलीपर्यत जा-ये करु इच्छिणाऱ्या प्रवाशांकरिता महत्वाची प्रवासी सुविधा उपलब्ध होवू शकणार आहे.

मुंबई लोकल नेटवर्कवरील प्रवासी ताण कमी होणार

सद्यस्थितीत मुंबई लोकल नेटवर्कवर प्रवाशांचा प्रचंड मोठा ताण वाढला आहे. एका ताज्या आकडेवारीनुसार संपूर्ण मुंबई उपनगरीय रेल्वेतून रोज सुमारे ७५ लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. यापैकी एकट्या पश्चिम रेल्वेवर दररोज ३० लाखांपेक्षा जास्त प्रवाशांची ये-जा असते.

विशेषतः अंधेरी, मालाड, कांदिवली आणि बोरीवली या स्थानकांवर सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी प्रचंड गर्दी असते. सध्या बोरीवली परिसरातील प्रवाशांना दक्षिण मुंबईत (हार्बर मार्गे) किंवा नवी मुंबईत पनवेलला जायचे असल्यास दादर, अंधेरी किंवा गोरेगावला उतरून ट्रेन बदलावी लागते, ज्यामुळे प्रवाशांचा मोठा वेळ वाया जातो. आता नव्या प्रकल्पामुळे वेळेची मोठी बचत होवू शकणार आहे.

# रोह्याचे माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांचा शिवसेनेत प्रवेश

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील राजकीय वर्तुळात मोठी घडामोड घडली असून रोहा शहराचे माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत पालकमंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेना (शिंदे गटात) जाहीर प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे रोहा तालुक्यात शिवसेनेची राजकीय ताकद आणखी वाढल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



संतोष पोटफोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर प्रमुख अमित उकडे, शहर युवक पदाधिकारी सागर घोबड यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला रोहा शहरात मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा सुरू झाली आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्याला आमदार महेंद्र दळवी, शिवसेना रोहा तालुका अध्यक्ष उद्देश वाडकर, संपर्कप्रमुख संदेश मोरे, जिल्हा नेते अनिल नवगणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संतोष पोटफोडे यांच्या शिवसेना प्रवेशामुळे आगामी काळात रोहा शहरातील राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त होत असून, त्यांच्या समर्थकांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेला रोहा शहरात संघटनात्मकदृष्ट्या मोठे बळ मिळाल्याचे बोलले जात आहे.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.३१) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २२३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून २,६५,७००/-रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# पैसा हे यशस्वितेचे मोजमाप नाही -आंचल दलाल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पैसा हे यशस्वीतेचे मोजमाप नाही, तर समाजासाठी व आप्तांसाठी केलेल्या आदर्शवत प्रयत्नांना यश म्हणू शकतो. यासाठी स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीचा प्रयत्न आवश्यक आहे, असे मत जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी व्यक्त केले.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दायित्व रायगड विभाग प्रचार प्रमुख तसेच राज्याचे वित्त विभागाचे उपसंचालक आनंद बिंदूमाधव जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या युवा संमेलनात जिल्हा पोलीस अधीक्षक भापोसे आँचल दलाल प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर पोलादपूर संघचालक प्रमोद दिक्षित हेदेखील उपस्थित होते.

प्रारंभी युवा उद्योजक विजय रिंगे यांनी नोकरी सोडून गावी आल्यानंतर जो व्यवसाय केला त्यानुसार भाजीवाला, मासेवाला व कोंबडीवाला अशी हाक मारली गेली. जलमित्र संजय यादवराव आणि किशोर धारिया तसेच पर्यटन उद्योजक रामदास कळंबे यांच्या मदतीने सोशल मिडियाद्वारे प्रसिद्ध झालेल्या लहुळसे गावाला देशातील विविध भागातील पर्यटक भेटी देऊ लागले आहेत अशी माहिती दिली. संकेत मोरे यांनी सुरत येथे हाऊसकिपिंगच्या व्यवसायाद्वारे अनेकांना रोजीरोटी दिली. मात्र, वडील सुनील मोरे यांनी रोजगार निर्मिती गावाकडे येऊन करण्यासाठी आग्रह केला आणि मुंबई गोवा महामार्गावर हॉटेल राजमुद्रा पर्यटकांच्या पसंतीस उतरले आहे, अशी माहिती दिली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे दायित्व रायगड विभाग प्रचार प्रमुख आनंद बिंदू माधव जोशी यांनी जगात, देशात, राज्यात सर्व युवा वर्गाला राजकीय पक्ष व संघटना आकर्षित करण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असे प्रतिपादन केले. समाज तोडण्यासाठी जेन झी सारखी आंदोलने केली जातात. जगाचे कल्याण झाले तर 'जेन झी' थोडीच उपेक्षित राहणार आहेत काय, असा सवाल त्यांनी केला. युवा वर्गाला उद्देशून प्रगत समाजाचे अंधानुकरण करुन जीवनपद्धती अंगिकारण्यापेक्षा आपआपल्या चालीरितींनुसार आचरण करावे, असे आवाहन केले.

शेवटी माजी नगराध्यक्ष अश्विनी गांधी यांनी वंदे मातरम् गायन करून युवा संमेलनाची सांगता करण्यात आली.

## सायन-पनवेल महामार्गावर आ. मंदा म्हात्रे यांच्या हस्ते
# पादचारी उड्डाणपुलाचे लोकार्पण



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सायन-पनवेल महामार्गावरील एस. बी. आय. कॉलनी परिसरात नागरिकांना तसेच पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना होणारा प्रचंड त्रास आणि दररोज निर्माण होणारा अपघातांचा धोका लक्षात घेऊन, बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या पाठपुराव्यातून आणि विशेष अर्थसंकल्पीय निधीतून ६.५० कोटी खर्चाचा भव्य पादचारी उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी सज्ज झालेल्या या उड्डाणपुलाचा 'लोकार्पण सोहळा' आज १ सोप्टेंर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

सायन-पनवेल महामार्ग हा अत्यंत गजबजलेला मार्ग असून एस. बी. आय. कॉलनी व आसपासच्या परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. या समस्येची गंभीर दखल घेत आमदार मंदा म्हात्रे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करून ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आणि हा अत्याधुनिक पादचारी पूल पूर्णत्वास नेला.

या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी आमदार मंदा म्हात्रे यांच्या मुख्य उपस्थितीसह ओमप्रकाश पवार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मेश्राम मॅडम, अमोल सोनोने, निलेश म्हात्रे, उपविभागीय अभियंता पिरजादे, उपविभागीय अभियंता बिडवई, उपविभागीय अभियंता कुंगराळकर तसेच अनिता शेट्टी, ज्योती पाटील, महेंद्र नाईक, प्रभाकर ठाकूर यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, "नवी मुंबईतील नागरिकांची सुरक्षितता आणि सोय हीच आमची पहिली प्राथमिकता आहे. सायन-पनवेल महामार्गावर पादचाऱ्यांच्या जीवाला असलेला धोका या पुलामुळे आता कायमचा टळला आहे. नवी मुंबईच्या पायाभूत सुविधांमध्ये आणि नागरी सुरक्षेत हा उड्डाणपूल एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरेल.या उड्डाणपुलाचे लोकार्पण झाल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी आणि पादचाऱ्यांनी समाधान व्यक्त करत आमदार. मंदा म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.

## नातवंडे हल्ली आजी-आजोबांबरोबर राहत नसल्याने संस्कारवर्गाची वेळ -विजय गोखले

**कर्जत : प्रतिनिधी**

एकत्र कुटुंब पद्धती होती तेंव्हा आजी-आजोबा संस्कार शिकवत असत. मात्र हल्ली तसे होत नसल्याने मुलांना संस्कार वर्गात टाकण्याची वेळ आली आहे. ही दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे. ही केवळ कादंबरी नसून बदलत्या सामाजिक परिस्थितीतील संस्काराचे महत्व सांगणारे पुस्तक ठरेल. आपण दररोज नाही पण सात - आठ दिवसात एक तरी पुस्तक वाचले पाहिजे व आपल्या मुलांना, नातवांना चांगली पुस्तके वाचण्याची सवय लावली तर संस्कार काय असतात? ते त्यांना कळेल.' असे महत्वापूर्ण प्रतिपादन जेष्ठ अभिनेते विजय गोखले यांनी केले.

कर्जत शहरातील कोतवाल नगर मध्ये राहणारे माधव तथा नंदन भडसावळे यांच्या ' संस्कार-अंतिम सत्य' यां पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रॉयल गार्डन मधील सीबीसी सभागृहात आयोजित करण्यात आला होता. जेष्ठ अभिनेते विजय गोखले यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अभिनेते राहुल वैद्य, लेखक माधव भडसावळे, सुचिता जोगळेकर आदी उपस्थित होते. यावेळी भडसावळे यांनी प्रास्ताविकात कादंबरीच्या लेखना मागील प्रेरणा व भूमिका स्पष्ट केली.

याप्रसंगी गिरीश आरेकर, दिलीप गडकरी, दीपक करोडे, मनीषा कुलकर्णी, धनंजय बेडेकर, गौतम वैद्य, सूर्याजी ठाणगे, कुमार गोखले, अनिल पावगी, कुमार व्यास, किशोर वैद्य, जितेंद्र ओसवाल, सतीश पिंपरे, वृषाली वैद्य, पांडुरंग गरवारे, मकरंद गोगटे, भालचंद्र जोशी, सुभाषचंद्र नातू, अच्युत कोडगिरे, कृष्णा लाड, श्रीकांत मनोरे, रमण गांगल, मुकुंद टुमणे, दिघे, किशोर कुलकर्णी, प्रमोद थत्ते, श्रीकांत ओक, रामनाथ गांगल आदी उपस्थित होते.



## न्यायदानाची प्रक्रिया केवळ कागदी नसून नैतिक मूल्यांवर आधारित -माजी न्यायमूर्ती अभय ओक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

"न्यायाधीश आणि वकील या दोघांनीही न्यायालयाचे पावित्र्य जपले पाहिजे. बदलत्या सामाजिक व व्यावसायिक परिस्थितीत दोघांनीही आपापल्या नैतिक जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. न्यायदानाची प्रक्रिया ही केवळ कागदी प्रक्रिया नसून ती नैतिक मूल्यांवर आधारित पवित्र धोरण आहे," असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय श्रीनिवास ओक यांनी केले.



३० ऑगस्ट रोजी आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग, तालुका विधी सेवा समिती पनवेल आणि पनवेल बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यान व मुलाखत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास बी. अग्रवाल यांनी भूषवले. यावेळी जिल्हा न्यायाधीश विमलनाथ सा. तिवारी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव रेवती कांटे, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. रत्नदीप पाटील आणि कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. रत्नदीप पाटील आणि कायदेतज्ज्ञ शैलेश कोंडसकर यांनी माजी न्यायमूर्ती ओक यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीत न्यायमूर्ती ओक यांनी वकिली व्यवसायातील आव्हाने, नवोदित वकिलांच्या सुरुवातीच्या काळातील अडचणी आणि शिष्टाचार. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करताना असलेल्या मर्यादा, प्रादेशिक भाषेत न्याय मिळण्याचे महत्त्व आणि न्याय प्रक्रियेतील विलंबाची कारणे, वकील संघटनांमधील वाढता राजकीय हस्तक्षेप आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या. नैतिक जबाबदाऱ्याच नव्हे, तर इतरही अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल संवाद साधण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. रत्नदीप पाटील, सचिव अॅड. प्रल्हाद खोपकर, उपाध्यक्ष अॅड. सचिन म्हात्रे, सहसचिव अॅड. दिपाली गावंड, खजिनदार अॅड. धनराज तोकडे, सहखजिनदार अॅड. विशाल डोंगरे, ऑडिटर अॅड. भुषण म्हात्रे, यांच्यासह या गठित करण्यात आलेल्या विविध समित्या व संपूर्ण कार्यकारिणीने सक्रिय सहभाग घेतला.

पान १ वरुन

## कामोठ्यातील 'एल.के. विवांता'च्या अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करा

**नागरिकांच्या घरांच्या स्वप्नाशी खेळ नको!**

सामान्य नागरिक आपल्या आयुष्यभराची कमाई खर्च करून घर खरेदी करतात. घर खरेदी करताना इमारतीला असलेली अधिकृत परवानगी, बांधकामाची वैधता आणि संबंधित कागदपत्रे यावर नागरिकांचा विश्वास असतो, मात्र विकसकांकडून मंजूर आराखड्यापेक्षा अधिक बांधकाम केले गेले आणि अशा बांधकामामध्ये सदनिका विकल्या गेल्या, तर भविष्यात त्याचा थेट फटका घर खरेदीदारांना बसण्याची शक्यता असते. अनधिकृत वाढीव बांधकामामुळे नागरिकांच्या घराच्या स्वप्नाला धक्का बसू शकतो. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करून अतिरिक्त मजले उभारणाऱ्या विकसकांवर महापालिका प्रशासनाने कठोर आणि तत्काळ कारवाई करणे गरजेचे आहे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली. नागरिक आपल्या कष्टाची आणि आयुष्यभराची कमाई खर्च करून घर घेतात. त्यामुळे विकसकांकडून नियमांचे उल्लंघन करून करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाचा भार सर्वसामान्य नागरिकांवर पडता कामा नये. अधिकृत परवानगी नसलेल्या बांधकामाला कोणत्याही प्रकारे संरक्षण मिळता कामा नये. महापालिका प्रशासनाने नियमांनुसार तातडीने कारवाई करून नागरिकांच्या हिताचे रक्षण करावे, अशी मागणी महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर आणि स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनी केली. यावेळी आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित प्रकरणाची माहिती घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश देण्याचे आश्वासन दिले.

**नागरिकांना बुकिंग न करण्याचे आवाहन; भाजप नगरसेवकांकडून जनजागृती**

दरम्यान, एल.के. विवांता इमारतीतील मंजूर परवानगीपेक्षा अधिक असलेले वरचे मजले विनापरवाना व अनधिकृत असल्याचा मुद्दा उपस्थित करीत भाजपच्या नगरसेवकांनी नागरिकांच्या हितासाठी जनजागृती सुरू केली आहे. या इमारतीतील अनधिकृत वाढीव मजल्यांवरील सदनिकांची बुकिंग करू नये तसेच यापूर्वी ज्यांनी अशा सदनिकांची बुकिंग केली असेल, त्यांनी संबंधित कागदपत्रांची व बांधकाम परवानगीची खातरजमा करून बुकिंग रद्द करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय आणि हक्क पोहोचवणे हे क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांचे मूळ सूत्र होते. शेतकऱ्यांसाठी त्यांनी केलेले काम अमिट आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून महसूल विभागांतर्गत प्रलंबित असलेली अर्धन्यायिक प्रकरणे जलद गतीने व तडजोडीने निपटारा करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार दि.१ सप्टेंबर २०२६ ते दि ३१ मार्च २०२७ या कालावधीत महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्यात येणार आहे. महसूली दावे कायमस्वरुपी निकाली काढल्यास अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताण कमी होऊन पक्षकारांची वेळेची व पैशांची बचत होईल.

# मन्सूर पटेल भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या ठाणे-नवी मुंबई विभागीय प्रमुखपदी

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्याक मोर्चाच्या विविध संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून पनवेल तालुक्यातील सक्रिय कार्यकर्ते मन्सूर पटेल यांची ठाणे व नवी मुंबई विभागीय प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल भाजपचे प्रदेश चिटणीस व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांनी पटेल यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी आणि प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांनी अल्पसंख्याक मोर्चाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या. यामध्ये मन्सूर पटेल यांच्यावर ठाणे व नवी मुंबई विभागाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे पनवेलसह ठाणे आणि नवी मुंबई परिसरातील अल्पसंख्याक मोर्चाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळणार आहे.

मन्सूर पटेल हे पनवेल तालुक्यात पक्षाच्या संघटनात्मक कामात सक्रियपणे कार्यरत असून कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे, विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे आणि पक्षाची भूमिका सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे.

पक्षनेतृत्वाने माझ्यावर विश्वास दाखवून महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी ठाणे व नवी मुंबई विभागात अल्पसंख्याक मोर्चाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन प्रामाणिकपणे काम करणार आहे. त्याचप्रमाणे पक्षाची विचारधारा, विकासाची भूमिका आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची प्रतिक्रिया मन्सून पटेल यांनी व्यक्त केली आहे.

# पनवेलमधील विकासकामांना गती

## स्थायी समिती सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा मंगळवारी (दि. १) महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजुरी देण्यात आली.

यावेळी स्थायी समिती सदस्य, अतिरिक्त आयुक्त २ महेशकुमार मेघमाळे, सचिव नानासाहेब कामठे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, उपसचिव अक्षय कदम , लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, उपमुख्य लेखा परीक्षक संदीप खुरपे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणची उद्याने व खेळाची मैदाने यांची आवश्यकतेनुसार डागडुजी-दुरुस्ती करणे या कामाच्या वाढीव रकमेकरिता मान्यता मिळण्याबाबतच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली.

पनवेल महानगरपालिका कार्यश्रेत्रात शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्रे व बेघर निवारा केंद्राकरिता भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यात आलेल्या



जागांचा दोन वर्षे कालावधीकरिता भाडेपट्टा मुदतवाढ देण्याबाबतचा विषय स्थायी समितीने मंजूर केला. सायन-पनवेल महामार्गावरील सीबीडी जंक्शन ते कळंबोली जंक्शन या भागातील पथदिवे व विद्युत व्यवस्थेची सुधारणा व नूतनीकरण तसेच तीन वर्षांकरिता निगा, देखभाल व दुरुस्ती करणेकामी द्वितीयप्रमाणे होणाऱ्या खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीने मंजूर केला.

महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणेची तीन वर्षांकरिता दैनंदिन परिचालन देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नूतनीकरण कामाची न्यूनतम निविदा मंजूर करण्याबाबतचा विषय समितीने मंजूर केला. महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या तळोजा फेज-१, फेज-२ व नावडे नोडमधील पारंपारिक पथदिवे बदलून एलईडी लावणे व पथदीप व्यवस्थेची तीन वर्षांकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणे या कामाच्या येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीने मंजूर केला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या खारघर नोडमधील पारंपरिक पथदिवे बदलून नवीन एलईडी पथदिवे लावणे व पथदीप व्यवस्थेची तीन वर्षे कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणेकामी Excess/ Saving statement प्रमाणे होणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीने मंजूर केला.

महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या कळंबोली नोडमधील पारंपरिक पथदिवे बदलून एलईडी लावणे व पथदीप व्यवस्थेची तीन वर्षांकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणे कामाच्या येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय मंजूर केला. तसेच पालिका मालकीची विविध कार्यालये व इमारतींमधील विद्युत व्यवस्थेचे तीन वर्षांकरिता निगा, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नूतनीकरणाचा विषयही स्थायी समितीने मंजूर केला.

# गव्हाण विद्यालयात किशोरवयीन विद्यार्थिनींना आरोग्याचे धडे



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

गव्हाण-कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात दुर्गा फाउंडेशनतर्फे विद्यार्थिनींसाठी आरोग्य मार्गदर्शन आणि क्रीडा दिनातील विजेत्यांसाठी बक्षीस वाटपाचा संयुक्त उपक्रम उत्साहात पार पडला. रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे २९ ऑगस्ट रोजी दुर्गा फाउंडेशन, नवी मुंबई या सामाजिक संस्थेच्या वतीने विद्यार्थिनींसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन तसेच विद्यार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप करण्यात आले.

दुर्गा फाउंडेशन ही सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रम राबविणारी संस्था असून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच विद्यार्थिनींमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्याचे कार्यही संस्थेच्या माध्यमातून केले जाते. याच सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून गव्हाण विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी दुर्गा फाउंडेशनच्या संस्थापक-अध्यक्षा शोभाताई भोईर, आरोग्यतज्ज्ञ डॉ. प्रगती जगताप तसेच फाउंडेशनचे सदस्य अनिल भोईर उपस्थित होते. विद्यालयाच्या वतीने प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर व पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमात सातवी ते दहावीच्या विद्यार्थिनींसाठी 'मासिक आरोग्य : कळी उमलताना' या विषयावर आरोग्यतज्ज्ञ डॉ. प्रगती जगताप यांनी पीपीटीच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले. किशोरवयीन मुलींनी आपल्या आरोग्याची योग्य काळजी कशी घ्यावी, आरोग्यविषयक स्वच्छतेचे महत्त्व, योग्य सवयी आणि संतुलित आहार याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना शास्त्रीय व समजण्यास सोप्या पद्धतीने माहिती दिली. शोभाताई भोईर यांनीही विद्यार्थिनींशी संवाद साधत आहार आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट केला. किशोरवयात शरीरात होणाऱ्या बदलांच्या काळात पौष्टिक व संतुलित आहार घेणे, आरोग्याची काळजी घेणे आणि स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा दुर्गा फाउंडेशनच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे म्हणून टी-शर्ट, कॉफी मग, डायरी व फोल्डर्स अशा विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. सुंदर व उपयुक्त साहित्य स्वरूपातील ही बक्षिसे मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व शिक्षक व सेवकवर्गाने सहकार्य केले. दर्शना माळी यांनी विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन व साहित्य वाटप केल्याबद्दल आभार मानले.

# नवी मुंबई पोलीस दलात फेरबदल : अनेक अधिकाऱ्यांच्या बदल्या

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले असून पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांसह वाहतूक शाखेतही महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले. महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदींनुसार आयुक्तालय स्तरावर हे आदेश काढण्यात आले आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत करण्यात आलेल्या बदल्यांत मपोनि अश्विनी पाटील यांची उलवे पोलीस ठाण्यातून आरबीआय सुरक्षा शाखेत, मपोनि मोहिनी लोखंडे यांची वाहतूक शाखेतून तुर्भे पोलीस ठाण्यात, पोनि औदुंबर पाटील यांची वाहतूक शाखेतून गुन्हे शाखेत, तर पोनि निरज चौधरी यांची बीडीडीएसमधून सुरक्षा शाखेत बदली करण्यात आली आहे.

दरम्यान, वाहतूक विभागातील कार्यरत अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्येही बदल करण्यात आले आहेत. पोनि महेशकुमार प्रल्हाद सरतापे यांची पनवेल शहर वाहतूक शाखेत, पोनि सुभाष शंकर पुजारी यांची नवीन पनवेल वाहतूक शाखेत, तर पोनि रेवणासिद्ध तुकाराम ठोंगले यांची सीवूड्स वाहतूक शाखेत नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पोउपनि सुभाष पावजी कोकणे यांची पोलीस उपआयुक्त, वाहतूक वाचक शाखेत नियुक्ती करण्यात आली आहे.

पनवेल आणि नवीन पनवेल परिसरातील वाढती वाहतूक लक्षात घेता पनवेल शहर वाहतूक शाखा आणि नवीन पनवेल वाहतूक शाखेत नव्या पोलीस निरीक्षकांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. यामुळे वाहतूक कोंडी, नियमभंग आणि रस्ते सुरक्षेच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# 'सीकेटी'च्या प्रदीप तांडेल यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे सहाय्यक शिक्षक प्रदीप तांडेल यांना उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेतर्फे राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा २०२६चे आयोजन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय, कळंबोली येथे करण्यात आले होते.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी स्टेट कोऑर्डिनेटर प्रदीप तांडेल यांना ज्युनिअर कॉलेजमधील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेतर्फे प्रतिष्ठित राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. प्रदीप तांडेल यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, सचिव एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# रवींद्र भोईर, सागर रंधवे यांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरव

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

गव्हाण-कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयातील रवींद्र भोईर आणि सागर रंधवे यांना महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याअंतर्गत कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा २९ ऑगस्ट रोजी कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या विद्यासंकुल सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्यात विविध शाखांतील गुणवंत संस्था, गुणवंत संस्थाचालक, पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अशा एकूण ८७ सेवकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे



कार्यरत असलेले विद्यालयाचे ज्येष्ठ विज्ञान शिक्षक व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर तसेच विद्यालयातून नुकतेच सेवामुक्त झालेले ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांना त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पुरस्कार सोहळा कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमास पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा परिषद सदस्य वैकुंठ पाटील, नगरसेवक बबन मुकादम, रवींद्र भगत, प्रतिभा भोईर, अमर पाटील तसेच महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष राजेश पाटील, कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे, संपर्कप्रमुख संजय भगत, विठ्ठल गोरे आणि रवींद्र पालवे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन अरुणशेठ भगत, वाय. टी. देशमुख, अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, विजयशेठ घरत, राहुल घरत, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी रवींद्र भोईर व सागर रंधवे यांचे अभिनंदन केले.

# खारघरमध्ये रविवारी रंगणार मैफिल-ए-अनुराग सुरेल संध्या

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय शास्त्रीय संगीत आणि सांस्कृतिक परंपरेचा समृद्ध वारसा जपण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'संस्कृतीर दिशारी' संस्थेच्या वतीने 'मैफिल-ए-अनुराग' या विशेष शास्त्रीय संगीत व नृत्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रेमभावना, अनुराग आणि भारतीय शास्त्रीय संगीत यांचा सुरेल संगम घडविणारी ही विशेष मैफल रविवारी (दि. ६) दुपारी ४ वाजता खारघर येथील पटेल हेरिटेज क्लब हाऊस, सेक्टर ११ येथे रंगणार आहे.



भारतीय शास्त्रीय संगीताच्या विविध अंगांचा आस्वाद रसिकांना एकाच व्यासपीठावर घेता यावा, या उद्देशाने कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. शास्त्रीय गायनासोबतच वादन आणि कथक नृत्याची बहारदार सादरीकरणे या मैफिलीचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. अनुभवी कलाकारांसोबतच गुणी नवोदित कलाकारांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त होणार आहे. या मैफिलीमध्ये सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी, पं. प्रताप पाटील आणि विदुषी सुरंजना बासू हे प्रमुख गायक म्हणून रसिकांसमोर आपली कला सादर करणार आहेत.

पं. तुषार चॅटर्जी, रंजना चॅटर्जी आणि सौर्यादीप चॅटर्जी यांच्या शास्त्रीय गायनाची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. कार्यक्रमात मोंद्रिता चॅटर्जी यांच्या कथक नृत्याचे विशेष सादरीकरण होणार असून त्यांच्या नृत्यातून भारतीय शास्त्रीय नृत्यपरंपरेतील भाव, लय आणि ताल यांचा मनोहारी आविष्कार अनुभवता येणार आहे. गायनाला मंदार दीक्षित संवादिनीची, तर प्रकाश पाटील आणि प्रसाद पाध्ये तबल्याची साथ करणार आहेत. सदर कार्यक्रमाचे निवेदन मोहर भट्टाचार्य करणार आहेत.

संगीत आणि नृत्याच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीतील प्रेम, अनुराग आणि भावविश्व रसिकांपर्यंत पोहोचविणारी ही मैफल शास्त्रीय संगीतप्रेमींसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे. नव्या पिढीला भारतीय शास्त्रीय संगीताची ओळख व्हावी आणि रसिकांना दर्जेदार सांगीतिक अनुभव मिळावा यासाठी 'संस्कृतीर दिशारी'च्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, या आगळ्यावेगळ्या सांगीतिक सोहळ्याचा मनमुराद आनंद घेण्यासाठी नवी मुंबई, खारघर तसेच परिसरातील संगीतप्रेमी आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पनवेल मार्केट यार्ड परिसरातील अनधिकृत व्यवसायधारकांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड'च्या वतीने पनवेल मार्केट यार्ड परिसरातील अनधिकृत व्यवसायधारक तसेच हातगाडीधारकांविरोधात सोमवारी (दि. ३१) अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली.

सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण पथक, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी, रायगड सुरक्षा रक्षक तसेच एमएसएफ सुरक्षा रक्षकांच्या पथकाने प्रभारी अधीक्षक राजेश डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कारवाई केली.

कारवाईदरम्यान सात हातगाड्या व इतर साहित्य जप्त करण्यात आले तसेच पाच हातगाड्यांवर तोडक कारवाई करून त्या हटविण्यात आल्या. मार्केट यार्ड परिसरातील अनधिकृत व्यवसायामुळे होणारे अतिक्रमण दूर करून वाहतुकीस तसेच नागरिकांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होऊ नये यासाठी ही कारवाई करण्यात आली.



# शांतिवनमधील आदिवासी शाळेत एनएसएस विभागातर्फे रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शांतिवन, नेरे, पनवेल येथील आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, बंधुभाव, एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि परस्पर सहकार्याची भावना रुजविणे हा होता.



स्वयंसेवकांनी आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्यासोबत रक्षाबंधन साजरे केले. यावेळी विद्यार्थ्यांना स्टेशनरी साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आणि स्वयंसेवक व विद्यार्थ्यांमध्ये आपुलकीचे व मैत्रीपूर्ण नाते अधिक दृढ झाले. रक्षाबंधनाच्या माध्यमातून भाऊ-बहीण या नात्यातील प्रेम, जिव्हाळा आणि परस्पर काळजीचा संदेश देतानाच समाजातील विविध घटकांशी जोडले जाण्याचा आणि त्यांच्यासाठी योगदान देण्याचा संदेश स्वयंसेवकांनी दिला.

विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवत त्यांच्याशी संवाद साधल्याने कार्यक्रमाला सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले. राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या उपक्रमातून सामुदायिक सहभाग, सामाजिक सलोखा, सेवावृत्ती आणि समाजासाठी काहीतरी देण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यास मदत झाली. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नीलम मोरे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्व सदस्य तसेच उत्स्फूर्तपणे सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे उपक्रम संस्मरणीय ठरला.

## शॉक लागून युवकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** शॉक लागून ३५ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील भानघर येथे घडली. घटनेची नोंद पनवेल तालुका पोलिसांत करण्यात आली. ३० ऑगस्टला दुपारी १ वाजता भानघर येथे भुवनेश्वर महतो (३५) विजेच्या पोलवरील काम करीत होता. अचानक त्याला शॉक लागून बेशुद्ध झाला. पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

## बसमध्ये चढताना रक्कम चोरली

**नवीन पनवेल :** बसमध्ये चढत असताना ४२ वर्षीय इसमाच्या खिशातील ४९ हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात २९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय जाधव हे कोपरखैरणे येथे राहत असून २९ ऑगस्टला दुपारी साडेतीनच्या दरम्यान ते बसमध्ये चढत होते. यावेळी एमजीएम हॉस्पिटलसमोरील बस स्टॉपवर चढणाऱ्या दोन अनोळखी इसमानी त्यांच्या खिशातील ४९ हजार रुपये चोरून नेले.


## संपादकीय

# मानसिकता बदल हवा

लैंगिक गुन्ह्यांच्या संदर्भात सरकारने कठोर कायदे, जलद तपास आणि वेगवान न्यायालयीन सुनावणी याबाबत आपली जबाबदारी पार पाडावीच. पण समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. कायद्याची भीती एका मर्यादेपर्यंतच गुन्हेगाराला रोखते. मात्र सन्मानाची संस्कृतीच त्याची विकृत मानसिकता बदलू शकते.

**दिल्ली-एनसीआरमध्ये अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या दोन घटना पुन्हा समोर आल्या आहेत. एका घटनेत १६ वर्षीय मुलीवर खाजगी बसमधील प्रवासादरम्यान चालक आणि वाहकाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तर दिल्लीतील बवाना भागातील एका खाजगी शाळेतील अवघ्या तीन वर्षांच्या चिमुरडीवर शाळेच्या बसचालकाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. दोन्ही घटनांतील आरोपींना पोलिसांनी अटक केली असून तपास सुरू आहे. कठोर कायदे असूनही आज इथे तर उद्या तिथे असे लैंगिक गुन्ह्यांचे झालेले का दिसत असावे? पुन्हा पुन्हा अशा घटना समोर येत असल्याने निव्वळ आपल्या परिसरात एखादी घटना घडल्यावरच समाज संतापून उठतो. अन्यथा अशा घटनांचे तपशील वाचून आपण क्षणभर थबकतो व पुन्हा कामाला लागतो असे खेदाने म्हणावे लागेल. वरील दोन घटनांपैकी पहिल्या घटनेमुळे अनेकांना निर्भया प्रकरणाची आठवण झाली. निर्भया प्रकरणानंतर देशातील लैंगिक गुन्ह्यांसंदर्भातील कायदे बरेच कठोर झाले आहेत. असा गुन्हा उघडकीस आल्यास त्याचा तपास व न्यायालयीन सुनावणी वेगाने पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न आता नक्कीच होतो. परंतु तरीही या गुन्ह्यांचे प्रमाण ठळकपणे कमी होताना दिसत नाही. यावेळी समोर आलेल्या पहिल्या प्रकरणातील मुलगी उत्तर प्रदेशातील असून तिने ग्रेटर नोएडा येथून स्लीपर बसमध्ये प्रवास सुरू केला. पोलिसांच्या माहितीनुसार दिल्लीतील काश्मिरी गेटपर्यंतच्या प्रवासात तिच्यावर अत्याचार झाला. दुसऱ्या प्रकरणात पोलिसांनी सीसीटीव्ही आणि अन्य पुराव्यांच्या आधारे आरोपी बसचालकाला अटक केली आहे. या घटनांची गंभीर दखल घेत दिल्ली सरकारने शालेय वाहतूक व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी आणि सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्याचे निर्देश दिले आहेत. आंतरराज्य बस वाहतुकीत जीपीएसच्या माध्यमातून देखरेखीची यंत्रणाही अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची पडताळणी, सुरक्षा ऑडिट आणि बालकांच्या सुरक्षेबाबतच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यावरही भर दिला जात आहे. ही कारवाई आवश्यक आणि स्वागतार्ह आहे. पॉक्सोसारखे कठोर कायदे देशात अस्तित्वात आहेत. अशा गुन्ह्यांमध्ये आरोपींना कायद्याच्या कचाट्यातून सुटणे शक्य होऊ नये आणि तपास व न्यायप्रक्रियेत अनावश्यक विलंब होऊ नये. परंतु प्रत्येक वेळी एखादी संतापजनक घटना घडल्यावर कायदे आणखी कठोर करण्याची मागणी करून प्रश्न सुटणार नाही. कारण प्रश्न केवळ कायद्याचा नाही. तो मानसिकतेचा देखील आहे. स्त्री ही बळजबरीने उपभोग घेण्याची वस्तू नाही. लहान मुलांच्या निरागसतेचा गैरफायदा घेणे हा केवळ गुन्हा नसून माणुसकीवरचा कलंक आहे. संमती म्हणजे काय, स्त्रीचा आणि मुलांचा सन्मान म्हणजे काय, चुकीच्या वर्तनाचे परिणाम काय होऊ शकतात याविषयीचे शिक्षण विशेषतः मुलांना देणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी एखादी व्यापक 'मानसिकता परिवर्तन' मोहीम राबवण्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालये, कुटुंबे, क्रीडा संस्था आणि समाजमाध्यमे या सर्व माध्यमांतून पुरुषांमधील विकृती बदलण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील. तरच कदाचित परिस्थितीत जाणवण्याजोगा बदल घडून आलेला दिसू शकेल.**

# 'युनेस्को'च्या व्यासपीठावर झळकणारी पराक्रम स्थळे



महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड-किल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेने जागतिक वारसास्थळ म्हणून मानांकन दिल्याने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक आहे. इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते, भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पूर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासता येते.

त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग हेच आपले कायम प्रेरणास्त्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे आहेत. अल्पायुष्यातही जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर भीमपराक्रम जगापुढे ठेवता येतो आणि हजारो वर्षे येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करता येते, असा वस्तुपाठ या १२ किल्ल्यांनी दिला आहे. आता हा दूरदृष्टीचा वारसा जागतिक झाला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने युनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस येथे झाली. जगातील सांस्कृतिक व नैसर्गिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे हा युनेस्कोचा उद्देश आहे.

यासाठी १९७२ मध्ये जागतिक वारसा परिषद (World Heritage Convention) तयार करण्यात आली.भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून देशातील अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत. यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही समावेश होता, मात्र महाराष्ट्राचे गड-किल्ले आतापर्यंत दुर्लक्षित होते. आता या मानांकनामुळे त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस भारतीय पुरातत्त्व विभागामार्फत केली जाते. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते. महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत.

यामध्ये स्वराज्याची राजधानी रायगड, महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग, मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षण कवच असलेला खांदेरी आणि दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ला यांचा समावेश आहे.हे बारा किल्ले शेकडो युद्धनीतींच्या प्रात्यक्षिकांसह आजही उभे आहेत. ही केवळ वास्तुकलेची नव्हे, तर तत्कालीन युद्धनीती सांगणारी जिवंत शिलालेखेच आहेत. प्रत्येक किल्ल्याला स्वतःची एक गाथा आहे, जगाला थक्क करणारी रोचक कथा आहे. राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून हे किल्ले अनमोल आहेत. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर बांधल्यामुळे शत्रूपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले.

मराठा स्थापत्यकलेतील 'माची' हे वैशिष्ट्य जगात इतरत्र कुठेही दिसत नाही. शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार व सुरक्षित दरवाजे ही 'गनिमी कावा' युद्धनीतीची गरज अधोरेखित करतात. किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रे होती.युनेस्को ऐतिहासिक महत्त्व, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्य, अद्वितीय स्वरूप, सांस्कृतिक इतिहासाशी असलेली नाळ व संरक्षणाची अवस्था या निकषांवर निवड करते. सर्व निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात. या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर प्रभावीपणे मांडले जाईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक पातळीवर अभ्यास होईल. ही केवळ महाराष्ट्राची नव्हे, तर संपूर्ण भारताच्या सन्मानाची बाब आहे. यामुळे ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे.


**-प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**



## बदलते तंत्रज्ञान

# 'हे' नंबर्स एटीएम पिन म्हणून टाकू नका, जाणून घ्या कारण

एटीएमचा पिन आपल्याला अगदी नॉर्मल वाटत असला तरी तो आपल्या खात्याचे रक्षण करणारा एक महत्त्वपूर्ण पिन आहे. त्यामुळे एटीएम पिनची संख्या किंवा आकडे जरी सामान्य वाटत असले तरी तुमच्या बँक खात्याची सुरक्षा सुनिश्चित या एटीएम पिनने केली जाते, पण आता यातदेखील धोका होऊ शकतो. काही पिन असे आहे की त्यामुळे तुमचे बँक खाते खाली होऊ शकते.




आजकाल लोक रोख रकमेने कमी खर्च करत आहेत. त्याऐवजी लोक डेबिट आणि क्रेडिट कार्डचा अधिक वापर करत आहेत. एटीएममधून पैसे काढणे, ऑनलाइन शॉपिंग आणि बिले भरणे या सर्व गोष्टींसाठी ते कार्डचा वापर करतात.

दरम्यान, एटीएमकार्ड युजर्सना लक्ष्य करून सायबर फसवणूकही होत आहे. तुमचे एटीएम कार्ड चार अंकी पिन नंबरने सुरक्षित आहे. त्यामुळे ही संख्या जरी सामान्य वाटत असली तरी तुमच्या बँक खात्याची सुरक्षा सुनिश्चित करते, पण अनेक युजर्स त्यांचा पिन नंबर काळजीपूर्वक निवडत नाहीत. प्रत्येकजण अंदाज लावण्यास सोपी संख्या निवडतो. यामुळे हॅकर्ससाठी हे सोपे होते. सायबर एक्सपर्ट्सच्या मते, चुकीचा पिन नंबर निवडल्यास तुमचे पैसे एका क्षणात चोरले जाऊ शकते. या पोस्टमध्ये कोणते पिन नंबर वापरू नयेत? आणि कोणते सुरक्षित आहेत, चला तर मग जाणून घेऊया...

पुनरावृत्ती किंवा अनुक्रमिक संख्या वापरू नका. यामुळे हॅकर्ससाठी हे एक सोपे लक्ष्य बनते. उदाहरणार्थ, १२३४, ११११, २२२२, ३३३३, ००००, ५५५५. त्याचप्रमाणे पिन क्रमांक उलट्या क्रमाने वापरू नका (४३२१). हे खूप असुरक्षित आहे. या व्यतिरिक्त बरेच लोक त्यांची जन्मतारीख पिन नंबर म्हणून वापरतात. उदाहरणार्थ, १३०८ (१३ ऑगस्ट), १५११ (१५ ऑक्टोबर) आणि जन्म वर्ष १९९९, १९९८, २००० पिन क्रमांक म्हणून वापरली जातात. अनेकदा वाढदिवसाचा अंदाज लावणे सोपे असते, कारण ते सोशल मीडिया आणि दस्तऐवजांमध्ये असतात.

याचप्रबरोबर मोबाईल नंबर, वाहन क्रमांक आणि आधार क्रमांकदेखील सुरक्षित नाहीत, कारण त्यांचा सहज अंदाज लावता येतो. त्यामुळे त्यापासून दूर राहणेही चांगले. सायबर सिक्युरिटी रिपोर्ट्सनुसार, त्यांना हॅक करण्यासाठी काही सेकंद लागतात.

# ख्यातनाम संगीतकार श्रीनिवास खळे



### निमित्त

ख्यातनाम संगीतकार श्रीनिवास विनायक खळे यांचा आज स्मृतिदिन. त्यांनी आपल्या कर्णमधुर आणि भावपूर्ण गीतांनी मराठी रसिकांना सहा दशकांहून अधिक काळ मोहिनी घातली होती. ते खळेअण्णा या नावानेही ओळखले जायचे.

श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी गुजरातमधील बडोदा येथे झाला. पूर्वी दादरच्या एका चाळीतल्या जागेत खळे कुटुंब राहायचे. गावाकडच्या मालमत्ता वा तत्सम कारणांमुळे मुंबई सोडावी लागली. संपूर्ण कुटुंब बडोद्याला स्थायिक झालं. बडोद्यातल्या सयाजीराव गायकवाड संगीत महाविद्यालयातच मधुसूदन जोशी यांच्याकडून त्यांनी संगीताचे प्राथमिक शिक्षण घेतले. पुढे अता हुसेन खाँ, निसार हुसेन खाँ आणि फैयाज हुसेन खाँ यांच्यासारख्या दिग्गजांकडून त्यांना शास्त्रीय संगीताची तालीम मिळाली.

बडोदा आकाशवाणीत संगीतकार म्हणून काही वर्षे नोकरी केल्यानंतर खळेअण्णा मुंबईत आले, पण त्यांना काम मिळेना. या काळात त्यांना त्यांच्या एका मित्राची मोलाची मदत झाली. त्याच्यामुळे राहण्या-खाण्याची सोय झाली. इथेच त्यांची ओळख के. दत्ता (दत्ता कोरगावकर) या संगीतकाराशी झाली. खळ्यांनी मग कोरगावकरसाहेबांचे सहाय्यक संगीतकार म्हणून काम करायला सुरुवात केली. याच काळात काही चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाच्या स्वतंत्र संधी त्यांच्याकडे चालून आल्या, मात्र ते चित्रपट कधीच पूर्ण झाले नाहीत आणि खळेसाहेबांचे सगळे कष्ट पाण्यात गेले. त्यामुळे त्यांना विलक्षण नैराश्य आले होते. आपल्या जवळची बाजाची पेटी विकून टाकून संगीताला रामराम ठोकावा आणि काही तरी दुसराच नोकरीधंदा शोधावा अशा टोकाच्या निर्णयाप्रत ते आले होते, पण अशा वेळी त्यांच्या पत्नीने त्यांना धीर दिला आणि या प्रसंगातून त्यांना सुखरूप बाहेर काढले. बऱ्याच हालअपेष्टांनंतर १९५२ साली त्यांची 'गोरी गोरी पान' आणि 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख' दोन गाणी असलेली पहिली तबकडी प्रसिद्ध झाली. आशा भोसले यांची तिच्यातील ही गीते तेव्हा खूप लोकप्रिय झाली आणि त्याबरोबर श्रीनिवास खळे हे नावदेखील. या दोन्ही रचना ग.दि. माडगुळकर यांच्या होत्या. मुळात या रचना लक्ष्मीपूजन चित्रपटासाठी होत्या, पण ऐनवेळी हा चित्रपट मूळ निर्मात्याऐवजी दुसऱ्याच एका निर्मात्याने बनवून त्यात संगीतकार म्हणून खळ्यांना घेतलेच नाही, पण खळ्यांनी लावलेल्या ह्या गीतांच्या चाली गदिमांना इतक्या आवडल्या होत्या की, त्यांनी त्यांची एचएमव्हीकडून एक वेगळी तबकडी बनवून घेतली. या दोन्ही गाण्यांनी खळ्यांना खऱ्या अर्थाने प्रसिद्धी दिली आणि मग खळे एक संगीतकार म्हणून मान्यता पावले.

हिंदी, संस्कृत, गुजराती, बंगाली इत्यादि भाषांमधील गीतांना खळेअण्णांनी जरी स्वरबद्ध केले असले तरी त्यांचे खरे योगदान हे मराठी भावगीत यामध्ये आहे. भावगीतांव्यतिरिक्त 'बोलकी बाहुली', जिव्हाळा', 'पोरकी', 'पळसाला पाने तीन' यासारख्या निवडक सहा मराठी चित्रपटांना त्यांनी संगीत दिले तसेच लता मंगेशकर, पं. भीमसेन जोशी या दिग्गजांना घेऊन त्यांनी 'रामश्याम गुणगान' हा गीतसमूह संगीतबद्ध केला होता. १९६८ सालादरम्यान आकाशवाणीतली नोकरी सोडून 'एचएमव्ही' या मातब्बर म्युझिक कंपनीत ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून सूत्रे हाती घेतली. २ सप्टेंबर २०११ रोजी ते निवर्तले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुमच्या डोळ्यांचा रंग सांगतो आरोग्याबद्दल...

तुम्ही अनेकदा ऐकलं असेल की, डोळे म्हणजे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आरसा असतो. डोळ्यांखाली काळी वर्तुळं तयार होणं ही मोठी सौंदर्य समस्या आहे. ही वर्तुळं का तयार होतात हे समजून न घेता त्यावर फक्त कॉस्मेटिक उपाय केले जातात, पण त्यामुळे काळ्या वर्तुळांची समस्या सुटत नाही; उलट ती आणखी तीव्र होते. डोळ्यांखाली काळी वर्तुळं निर्माण होण्यास एखादं विशिष्ट कारणच कारणीभूत असतं असं नाही, तर काळ्या वर्तुळांच्या समस्येमागे अनेक कारणं करतात. त्यातील बरीचशी कारणं ही जीवनशैली आणि सवयींशी निगडित असतात. दरम्यान, याची कारणं आणि त्यावर उपचार कसे करावेत याबाबत बोलताना गुजरात, डॉकट्यूबचे सदस्य डॉ. जगदीश सखिया यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



डॉ. जगदीश सखिया यांच्या म्हणण्यानुसार डोळ्यांचा रंगदेखील बदलतो आणि रंग बदलण्याची विविध कारणं असू शकतात तसेच तुमच्या डोळ्यांचा रंग तुमच्या आरोग्याबद्दल काय सांगतो? हेदेखील जाणून घेऊ.

काहींच्या डोळ्यांचा रंग थोडासा गुलाबी असतो. त्याचं कारण असं की, विषाणूजन्य संसर्ग, ॲलर्जी किंवा चिडचिडेपणामुळे असा रंग होऊ शकतो. त्यावर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार घेणं गरजेचं आहे.

हिमोलेक्रिया : हा एक दुर्मिळ आजार असून त्यामध्ये रुग्णाच्या डोळ्यांतून रक्ताचे अश्रू येतात. अश्रूंमधून रक्तस्राव ही एक वैद्यकीय स्थिती आहे, ज्याला हेमोलेक्रिया म्हणतात. ही स्थिती रक्तरंजित अश्रू म्हणून ओळखली जाते. ही एक दुर्मिळ स्थिती आहे. त्यात अश्रूंचा रंग काहीसा लाल असू शकतो किंवा पूर्णपणे रक्तस्राव होऊ शकतो. जर तुम्हाला रक्तरंजित अश्रूंशिवाय इतर कोणतीही लक्षणं, जसे की डोळ्यातील अस्वस्थता किंवा वेदना जाणवत असतील, तर लगेच वैद्यकीय उपचार घ्या.

पिंग्यूकुलाचे सर्वांत सामान्य व महत्त्वाचे लक्षण म्हणजे पांढऱ्या भागावर पिवळा डाग दिसणे. गंभीर प्रकरणांमध्ये तो शस्त्रक्रिया काढून टाकणे आवश्यक असू शकते.

हेटेरोक्रोमिया म्हणजे बुबुळाचा रंग बदलणे किंवा बुबुळाच्या रंगद्रव्यावर परिणाम करणारी परिस्थिती यांसारख्या दुर्मिळ स्थिती उद्भवणे.

म्हणूनच डोळ्यांचा रंग बदलत असेल तर सावधान व्हा आणि आवश्यक ती काळजी घ्या.

# भाजपतर्फे अलिबाग, पालीमध्ये भव्य दहीहंडी उत्सव

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने अलिबागमध्ये यंदा 'भाजपा दहीहंडी २०२६'चे अत्यंत दिमाखदार आणि पारंपरिक पद्धतीने आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये पुरुष आणि महिला अशा दोन्ही अंतिम विजेत्या गोविंदा पथकांना प्रत्येकी २ लाख ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक दिले जाणार असल्याची माहिती भाजपाचे रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुरुष पथक (अंतिम विजेता): २ लाख ५१ हजार रुपये महिला पथक (अंतिम विजेता): २ लाख ५१ हजार रुपये,पुरुष सलामी (६ थर): प्रत्येक पथकास ११ हजार रुपये,महिला सलामी (५ थर): प्रत्येक पथकास ७ हजार रुपये अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

यंदा हा उत्सव चेंडरे येथील बावनकुळे यांच्या सभेसाठी वापरण्यात आलेल्या प्रशस्त जागेत आयोजित करण्यात आला आहे.उत्सवाला कोणतेही गालबोट लागू नये आणि पारंपरिक संस्कृती जपली जावी,



यासाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे शाहीर सम्राट चंद्रकांत माने आणि शाहीर माळी यांचा पोवाड्यांचा व लोककलांचा कार्यक्रम. पार्श्वगायक चेतन लोखंडे यांचे सुश्राव्य गायन. तरुणांना व्यायामाची प्रेरणा मिळावी यासाठी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शरीरसौष्ठवपटू 'भारत श्री' निलेश दगडे यांचे मार्गदर्शन व शरीरसौष्ठव प्रदर्शन.

हा दहीहंडी उत्सव अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघातील पथकांसाठी मर्यादित असून, परिसरातील सुमारे ७० ते ७५ नामांकित गोविंदा पथके यात सहभागी होतील असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. उत्सवाचे नियोजन अधिक सुलभ व्हावे आणि पथकांच्या सूचना जाणून घेता याव्यात, यासाठी सर्व गोविंदा पथकांच्या प्रतिनिधींची बैठक २ तारखेला सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या पत्रकार परिषदेला भाजपाचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पारंपरिक जल्लोषात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडणाऱ्या या महोत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, नगरसेवक ॲड अंकित बंगेरा, पंचायत समिती सदस्य प्रियदर्शनी पाटील, माजी उपसरपंच यतीन घरत, सुनिल दामले, तालुका अध्यक्ष अशोक वारगे आदी उपस्थित होते.

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड-पाली तालुक्यात यंदा भव्य दहीहंडी उत्सव २०२६ रंगणार असून, या उत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. भारतीय जनता पार्टी सुधागड-पालीच्या वतीने ५ सप्टेंबर रोजी पाली येथील बापूजी मंदिरासमोर या भव्य दहीहंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सुधागड पालीत दहीहंडीचा साहसी, धाडसी आणि संस्कृती जपणारा पारंपारिक दहीहंडीचा थरार अनुभवायास मिळणार आहे. रायगडसह राज्यातील विविध भागांतून येणाऱ्या गोविंदा पथकांचा थरारक सन्मान आणि दहीहंडी फोडण्याची रंगत या उत्सवात पाहायला मिळणार आहे. विशेष म्हणजे स्पर्धेसाठी रोख पारितोषिक म्हणून ३ लाख ३३ हजार ३३३ रुपये, तसेच सुधागड तालुका मर्यादित स्पर्धेसाठी १ लाख ११ हजार १११ रुपयांचे आकर्षक पारितोषिक ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे सुधागड तालुका मर्यादित १ लाख ११ हजार १११ रुपये व आकर्षक बक्षीसाची गोविंदा पथकांना पर्वणी लाभलीय. तर महिला गोविंदा पथकांना ही आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. अशी माहिती भाजप चे ज्येष्ठ नेते प्रकाशभाऊ देसाई, गिताताई पालरेचा, तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, प्रणाली शेठ, नगराध्यक्ष पराग मेहता, अरिफ मनियार, शरद चोरगे, निलेश खोडागळे, शिरीष सकपाळ आदिसह अन्य पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रकाश देसाई यावेळी म्हणाले कीम भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असलेले सण-उत्सव हे केवळ आनंद आणि उत्साहाचे पर्व नसून, समाजाला एकत्र आणणारे आणि सांस्कृतिक परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम आहे. याच सामाजिक आणि सांस्कृतिक भावनेतून दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, सतीश धारप, माजी खासदार तथा जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील आणि आमदार रवींद्र पाटील यांच्या विचारधारेतून सामाजिक परंपरा, संस्कृती आणि उत्सवांचे जतन व संवर्धन करण्याला विशेष महत्त्व दिले जात आहे. त्याच भावनेतून सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचा हा प्रयत्न असल्याचे देसाई यांनी सांगितले.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- पिसार्वे येथील सर्व्हे नं. ३८ पासून ते मौजे करवले बुद्रुक येथील सर्व्हे नं. ८७ पर्यंत २४.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार २४.०० मी. रुंद नियोजित रस्त्याने बाधित मौजे करवले बुद्रुक येथील सर्व्हे नं. ८५/४ मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्राचे व ना-बांधिव (non-Buildable) क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे करवले बुद्रुक, ता. पनवेल येथील श्री. महेश जनार्दन मुंबईकर यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील रस्त्याने बाधित व ना-बांधिव क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- करवले बुद्रुक, सर्व्हे नं. ८५/४ रस्त्याने बाधित व ना-बांधिव क्षेत्र ६००.०० चौ. मी.

त्यास नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.स.न. ८९, ८७
पश्चिमेस : ला.स.न. ८७, ८५ पै
दक्षिणेस : ला.स.न. ८७
उत्तरेस : ला.हि.नं. ८५/२

टिपः- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे,

दिनांक : ३१/०८/२०२६

**सही/-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका,**

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/
२६-२६/५७४ /२०२६

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## लोणेरे विद्यापीठाचा उद्या दीक्षांत समारंभ

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड येथे ५८वा दीक्षांत समारंभ गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचे उपस्थित होणार आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीतील हा महत्त्वपूर्ण टप्पा असून, विविध अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी व पदविका प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा दिवस आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर लोणेरे येथील विद्यापीठ परिसरात या सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे.

या ५८व्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णुदेव वर्मा भूषविणार आहेत.तसेच महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच महाराष्ट्राचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले आणि महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

दीक्षांत समारंभ गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता लोणेरे येथील पदविका सभागृहात संपन्न होणार आहे. कुलगुरू, कार्यकारी व विद्वत परिषद सदस्य तसेच विद्यापीठ परिवाराच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्याकडे विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

तंत्रज्ञानाच्या नव्या युगात ज्ञान, कौशल्य आणि संस्कारांची शिदोरी घेऊन नव्या वाटचालीला सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा दीक्षांत समारंभ त्यांच्या आयुष्यातील एक नवा 'उदय' ठरणार आहे.

## रोहा रोटरी क्लबतर्फे महाआरोग्य शिबिर

**रोहा :** रोह्यातील सामाजिक क्षेत्रातील अग्रगण्य व प्रतिष्ठित संस्था रोटरी क्लब रोहा, रोहा अष्टमी नगरपरिषद व सूरज हॉस्पिटल सानपाडा नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व रिक्षा व मिनिडोअर चालकांसाठी मोफत महाआरोग्य शिबीर, उपचार व औषधे वाटप हा महत्वपूर्ण उपक्रम ३० ऑगस्ट रोजी भाटे सार्वजनिक वाचनालय येथे संपन्न झाला.रोटरी क्लब रोहा नेहमीच समाजातील विविध घटकांसाठी काम करीत असतात दिनेश जैन यांनी रोटरी क्लब रोहाच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून उपक्रमांचा धडाका सुरु केला असुन रोहेकरांना नेहमीच सेवा देणाऱ्या रिक्षा व मिनिडोअर चालकांसाठी राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक झाले.या महाआरोग्य शिबिराचे उदघाटन रोह्याच्या नगराध्यक्षा वनश्री शेडगे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले यावेळी रोटरी क्लब चे सर्व सदस्य व एन्स उपस्थित होते.



## जवाहर नवोदय विद्यालयात हिंदी पंधरवडा

**माणगाव : बातमीदार**



पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर येथे १ ते १५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत चालणाऱ्या हिंदी पंधरवड्याचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य रामलाल दधिच यांच्या हस्ते सरस्वती देवीच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले.

यावेळी विद्यार्थिनी प्राची तिवारी व ईश्वरी देशमुख यांनी हिंदी भाषेचे महत्त्व व वैशिष्ट्ये आपल्या मनोगतातून विशद केले. हिंदी शिक्षिका रश्मी मिश्रा यांनी आपल्या भाषणातून हिंदी भाषेविषयी जनजागृती निर्माण करण्याची गरज व्यक्त केली. तसेच हिंदीला राजभाषेचा दर्जा अधिक प्रभावीपणे रुजविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रभारी प्राचार्य रामलाल दधिच यांनी हिंदी ही जगातील प्रमुख भाषांपैकी एक असून, हिंदी भाषेला वैश्विक स्तरावर अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन केले.हिंदी पंधरवड्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी आवड, अभिमान आणि जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बंकट भेंडेकर व निरंजन शिंदे या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महावितरण

### जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या सं व सु. विभाग गोरेगाव कार्यालयांतर्गत पोलादपूर परिसरातील तसेच गोरेगाव परिसरातील नागरिकांना सूचित करण्यात येत आहे की RDSS योजनेतील नवीन २२ केव्ही बोरावळे उपरी विद्युत वाहिनी तसेच २२ केव्ही आंबेत उपरी विद्युत वाहिनी चे काम पूर्ण झालेले असुन सदर वीज वाहिनी दि. ०२/०९/२०२६ रोजी किंवा तदनंतर कधीही कार्यान्वित होवू शकते. सदर बोरावळे विद्युत वाहिनी तुर्भे-चरई-वडाचा कोंड-रानवडी-घागरकोंड या गावातील परिसरातून व आंबेत कडे जाणारी वाहिनी २२ केव्ही गोरेगाव उपकेंद्र-काचले-पुरार फाटा (ITI College) या परिसरातून गेलेली आहे. तरी सदर विद्युत वाहिनीच्या खांबाला व ताणाला कोणीही स्पर्श करू नये, तसेच गुरे बांधू नयेत. वीज वाहिनीच्या वाहक तारांजवळील झाडांच्या फांद्या महावितरण च्या परवानगी शिवाय तोडू नये. तसेच सदर वीज वाहिनीच्या खाली कुठल्याही शेत मालाची साठवणूक करू नये अथवा कोणतेही ज्वलनशील सामान वाहिनीच्या खाली ठेऊ नये.

वाहिनी चालु असताना अथवा करत असताना कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाल्यास महावितरण कंपनी जबाबदार राहणार नाही याची वरील परीसरालगत येणाऱ्या सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी हि विनंती.

**कार्यकारी अभियंता, गोरेगांव विभाग.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली सामायिक शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. गजानन दामोदर पाटील व ईतर** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. गजानन दामोदर पाटील व ईतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

मिळकतीचे वर्णन-: **मौजे- खार दुतर्फा बोर्ली (५५३८७८) (ULPIN : 27598319676), तालुका-पेण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १२८/१/ब<br>खाते क्रमांक : १८० | २ | ०.५६.४०<br>पो.ख. ०.०२.००<br>एकूण - **०-५८-४०** | ८.८८ |
| **या एकूण विक्री क्षेत्राचे ५८.४०** | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ.संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **७ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - १/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०६
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चिलठण ता. खालापूर जि. रायगड येथिल खालील प्रमाणे हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी संबंधित कब्जेदार/मालक १) श्री. संतोष विठ्ठल गायकवाड, २) श्रीमती. अरूणा सिताराम पवार, ३) श्रीमती. साधना लक्ष्मण वाघमारे यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे, चिलठण ता.खालापूर, जि.रायगड**

| अनु क. | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १. | ५/३/क | ०-०३-०० | ०.०६ |
| २ | ५/३/ई | ०-०५-०० | ०.०९ |

तरी सदरहू मालक / कब्जेदार यांचे, व्यतिरीक्त खालील सदरहू मिळकती संदर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त साठेकरार, बोजा, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा कुळ वहिवाट, ताबा कब्जा, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त जप्ती, संपादर रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा कसलाही व कोणताही हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सहया करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात. तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणाऱ्या हरकती जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून, सदरच्या मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- खालापूर
दिनांक ३१/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. सचिन आर चाळके**

**ऑफिस :- गोकुळ नगरी बिल्डींग, रुम नं १०७, पहिला मजला, व्हिलेज रीस, तालुका खालापूर, जि. रायगड ४१०२२२ मो. ८६००९९०४६९**

## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १२ सन २०२६-२०२७**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रायगड जिल्हयातील पोलादपुर तालुक्यातील कापडे पितळवाडी बोरघर कामथे रस्ता प्रजिमा १०१ कि.मी. ०/०० ते ५/०० मध्ये सुधारणा व रुंदीकरण करणे | ३,१९,२४,०७८/- | १,६०,०००/- | २,३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| २ | पोलादपुर रानवडी सडे बोरावळे रस्ता प्रजिमा ९८ किमी ३/०० ते ११/६०० मध्ये सुधारणा करणे | ७८,६७,५२८/- | ७९०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०१/०९/२०२६** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०८/०९/२०२६** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, फार्ट मुंबई यांचे कार्यालयात दि. ०४.९.२०२६ रोजी दु. १२.०० वाजता (अ.क्र.१) |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा. अधीक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ , कोकण भवन नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १०/०९/२०२६ वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/-**
**( एस.एम. कांबळे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/ ३०४३**
**दिनांक : ३१/०८/२०२६**

**आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी२५८८**

# नवी मुंबईतील महिला होणार लखपती

## बचत गटाच्या उत्पादनांना बाजारपेठेसाठी महासभेत प्रस्ताव येणार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शहरातील बचत गट आणि घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महापालिकेतर्फे 'लखपती दिदी' योजना राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर ही योजना महापालिका हद्दीत राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याचा प्रस्ताव आगामी महासभेत मांडण्यात येणार आहे. वाशीतील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे रविवारी आयोजित महिला मेळाव्यात सभागृहनेते सागर नाईक यांनी याबाबत घोषणा केली.




स्वयं सहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांना वर्षाला किमान एक लाख रुपयांचे उत्पन्न मिळवून देण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण, सूक्ष्म वित्तीय सहाय्य, उद्योजकता विकास आणि विपणनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. विविध उपजीविका प्रकल्पांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, मात्र केवळ घरगुती पातळीवर उत्पादन तयार करण्यापुरती ही योजना मर्यादित राहणार नसल्याचे नाईक यांनी स्पष्ट केले.

महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना विक्रीसाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नवी मुंबईबाहेर, देशभरात त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचा महापालिकेचा प्रयत्न असेल. उत्पादन तयार केल्यानंतर त्याच्या विक्रीसाठी महिलांना पुन्हा स्वतंत्रपणे बाजारपेठ शोधावी लागू नये यासाठी आवश्यक व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून योजनेचा विषय सभागृहात आणून त्याला मंजुरी घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नवी मुंबई महापालिकेतून या स्वरूपाची विस्तृत योजना प्रथमच सुरू करण्यात येणार असून देशातील इतर कोणत्याही महापालिकेत अशा प्रकारची योजना नसल्याचा दावाही नाईक यांनी केला. योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढण्यासोबतच कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडण्याची अपेक्षा आहे. तसेच महिलांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊन शहरी गरिबी कमी करण्यासही मदत होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे. 'लखपती दीदी' योजनेसाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात सहा कोटी ५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण, सूक्ष्म वित्तीय सहाय्य, उद्योजकता विकास आणि विपणनासाठी मदत उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

# सीबीडी उपविभागाची वीजचोरीविरोधात धडक मोहीम

## ७६ लाखांची चोरी उघड

**नवी मुंबई : बातमीदार**

वीजचोरीला आळा घालण्यासाठी महावितरणच्या सीबीडी बेलापूर उपविभागाने विशेष मोहीम हाती घेतली असून ऑगस्ट महिन्यात २२ प्रकरणांमध्ये ७६.८५ लाख रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली आहे. भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या आदेशानुसार परिमंडलातील विविध उपविभागांमध्ये वीजचोरांविरोधात धडक मोहीम राबविण्यात येत आहे.



वाशी मंडलाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नेरूळ विभागाचे कार्यकारी अभियंता सुहास बेडगकर व अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत बाणाईत यांच्या नेतृत्वात सीबीडी बेलापूर उपविभागात ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सीबीडी बेलापूर आणि उलवे परिसरात वीज जोडण्या तपासण्यात आल्या असता २२ वीजचोरीची प्रकरणे समोर आली. वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार १,९०,७५७ युनिटची ७६.८५ लाख रुपयांची वीजचोरी पकडण्यात आली. यामध्ये उलवे येथील दोन प्रकरणांमध्ये अनुक्रमे ५१.४१ लाख आणि ११.८४ लाख रुपयांची वीजचोरी पकडण्यात आली असून संबंधित ग्राहकांकडून वीजचोरीची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

ही कारवाई अभियंते अश्लेषा रोकडे, गौरी वझरकर, माधुरी भोसले, रवींद्र नाहीदे, हेमंत जाधव व अविनाश आभाळे यांनी केली. मीटरमध्ये फेरफार, रेझिस्टन्स टाकणे, बायपास करणे, सर्व्हिस वायरला टॅप करून वीजचोरी अशा प्रकारची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

# सारसोळेत भजन संस्थेची स्थापना; वासुदेवबुवा मुकादम यांच्या हस्ते उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार**

अमृतबुवा पाटील नेरुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सारसोळे गावात प्रथमच गुरुदत्त प्रासादिक सांप्रदायिक संगीत भजन संस्था स्थापन झाली असून तिचा उद्घाटन सोहळा शनिवारी दत्त मंदिर, सारसोळे येथे उत्साहात संपन्न झाला. ज्येष्ठ भजन कलावंत वासुदेवबुवा मुकादम यांच्या हस्ते या संस्थेचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी नवी मुंबई भूषण रामभाऊ पाटील, कीर्तनकार सुनील महाराज राणकर, मुख्य मार्गदर्शक भजनकार अमृत पाटील नेरुळकर, उद्योजक कैलास म्हात्रे, व्यसनमुक्ती जनजागृती विषयक स्टार प्रचारक दिलीप आमले, मारुती म्हात्रे, पखवाज वादक रुपेशबुवा पाटील, स्वर संगमचे मुख्य सचिव रामचंद्र म्हात्रे, पद्माकर पाटील, परशुराम पाटील, नंदकुमार ठाकूर, मनोज मेहेर, रमेश भगत आदी मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबईत भजनाची मोठी परंपरा असताना सारसोळेत एकही भजन संस्था नव्हती, मात्र आता ही उणीव दूर होत असल्याचे पाहून मी कृतकृत्य झालो, असे प्रतिपादन रामभाऊ पाटील यांनी केले. भजन आत्मिक समाधान मिळवून देणारे आणि माणूस व देव यामधील अंतर कमी करणारे माध्यम आहे.

अमृतबुवा पाटील यांच्या पुढाकाराने सारसोळेत प्रथमच भजन संस्था सुरू होत असून याची सारसोळेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होणार असल्याचे प्रतिपादन सुनील महाराज राणकर यांनी केले. ग्रामस्थांच्या सहकार्याने सुरू झालेली भजन संस्था ग्रामस्थांच्या सुख-दुःखात महत्त्वाची भूमिका निभावेल, असा आशावाद अमृत पाटील नेरुळकर यांनी व्यक्त केला. सूत्रसंचालन विवेकानंद भोईर यांनी, तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सत्यवान वैती, पद्माकर वैती, नरेंद्र मेहेर, मायादेव मेहेर व ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

# आदिवासी वसतिगृहे शासनाच्याच ताब्यात!

## खासगीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम

**नवी मुंबई : बातमीदार**

काही वृत्तपत्रांमध्ये 'आदिवासी विद्यार्थी वसतिगृहांच्या खासगीकरणाचा डाव' किंवा 'वसतिगृहांचे व्यवस्थापन खासगी संस्थेकडे सोपवले' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेली बातमी पूर्णतः चुकीची, गैरसमजातून पसरवलेली आणि सत्यपरिस्थितीला धरून नाही. या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाने स्पष्टीकरण दिले असून वसतिगृहांचे नियंत्रण, मालकी आणि संपूर्ण प्रशासकीय कारभार शासनाकडेच असल्याचे स्पष्ट केले आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात ४९० शासकीय वसतिगृहे असून त्यांची एकूण विद्यार्थी क्षमता ६५,०८४ इतकी आहे. दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना मोफत व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा एक शैक्षणिक व सामाजिक स्वरूपाचा पुढाकार आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम राबविण्यासाठी नागपूरच्या कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराचा कार्यकाळ तीन वर्षांचा म्हणजे १५ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२८ असा आहे.

संबंधित संस्था स्वयंप्रेरणेने आणि कोणताही मोबदला न घेता विविध उपक्रम राबविणार आहे. या संस्थेला वसतिगृहांची इमारत, मालमत्ता किंवा प्रशासकीय व्यवस्थापनाचे कोणतेही अधिकार हस्तांतरित करण्यात आलेले नाहीत. सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी १८ मोफत उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये उद्योजकता विकास कार्यशाळा, करिअर मार्गदर्शन शिबिर व व्याख्याने, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण, शैक्षणिक योजना व शिष्यवृत्तीची माहिती, विद्यार्थी विकास मेळावा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, स्पोकन इंग्लिश मार्गदर्शन, व्यसनमुक्ती व आर्थिक साक्षरता मार्गदर्शन, संविधान अभ्यास वर्ग, महापुरुष जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन, विविध स्पर्धांचे आयोजन, अभ्यास व निसर्ग पर्यटन सहलींचे आयोजन, सेवा शिक्षण उपक्रम व संस्था भेटी, अनुसूचित जमातीच्या शासकीय योजनांची माहिती, वसतिगृहांवर नियमित आरोग्य तपासणी, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक समन्वय व पाठपुरावा, वसतिगृहातील एकूण समस्या व विद्यार्थ्यांच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण यांचा समावेश आहे.

संस्थेचे उपक्रम वसतिगृह परिसरात संबंधित प्रकल्प अधिकारी व गृहपालांच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीच पार पडतील. मुलींच्या वसतिगृहात महिला प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून महिला गृहपालांच्या उपस्थितीतच वर्ग घेतले जातील. आदिवासी वसतिगृहांचे कोणतेही खासगीकरण झालेले नाही. विद्यार्थी, पालक व नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन आदिवासी विकास विभागातर्फे करण्यात येत आहे.

# वाजेकर कॉलेजमध्ये बारावीच्या अर्ज प्रक्रियेला सुरुवात

**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालय विभागात इयत्ता १२वीच्या एचएससी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२७ साठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रे भरण्याचा शुभारंभ मंगळवारी (दि. १) करण्यात आला. प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू तसेच उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागप्रमुख बाबूलाल पाटोळे यांनी प्रास्ताविकातून विद्यालयाच्या उज्ज्वल निकालाची परंपरा सांगितली. तसेच या वर्षी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.लाईफ वर्कर तथा रयत सेवक को-ऑप बँकेच्या वाशी शाखेचे चेअरमन प्रा. किशोर पाटील यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेचे आवेदनपत्र अचूक पद्धतीने कसे भरावे, आवेदनपत्रातील माहितीची पडताळणी कशी करावी आणि अर्ज भरताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेतर्फे प्रदान करण्यात आलेला 'कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२६' प्राप्त झाल्याबद्दल कनिष्ठ महाविद्यालयाच्या कला शाखेतील प्रा. प्रमोद म्हात्रे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रा. राजू खेडकर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांनी बोर्ड परीक्षेचे महत्त्व विशद करून नियोजनबद्ध अभ्यास करून परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे, असे मार्गदर्शन केले. स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीची माहिती देत विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन दीपक शेडगे, तर आभार राजू खेडकर यांनी मानले.

# मोफत स्मार्ट कार्डसाठी नागरिकांची झुंबड

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त ४ ऑगस्टपासून सुरू करण्यात आलेल्या मोफत एसटी स्मार्ट कार्ड वितरण उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत उर्वरित महिलांच्या स्मार्ट कार्डसाठी तब्बल ६८० नोंदणी करण्यात आली. तसेच वाढदिवसानिमित्त यापूर्वी नोंदणी केलेल्या ३८७ महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.




जनसेवा हीच ईश्वरसेवा या भावनेतून हा उपक्रम पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार क्रीडा व सांस्कृतिक समितीचे सभापती तथा प्रभाग क्रमांक २४ चे नगरसेवक गिरीश म्हात्रे यांनी व्यक्त केला. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना एसटी बससेवेचा अधिक सुलभपणे लाभ

### ६८० जणांची नोंदणी

घेता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्मार्ट कार्ड मिळविण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने शिबिराला उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी सुरज पाटील, किरण पाटील, संजय ठाकूर, हिराजी घरत, अशोकबुवा म्हात्रे, चंद्रकांत ठाकूर, जनार्दन म्हात्रे, प्रभाकर पाटील, नारायण पाटील, रत्नाकर पाटील, चंद्रशेखर भोपी, अक्षय पाटील, उदय पाटील, गणपतबुवा भोपी, जयंत म्हात्रे, संदेश गायकवाड आणि अरविंद ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपक्रमात सहभागी झालेल्या महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

# उरणचे मोहम्मद शेख यांची अभियांत्रिकी विषयात पीएचडी

**उरण : बातमीदार**

उरणमधील डाऊरनगरचे सुपुत्र मोहम्मद शेख यांनी मुंबईतील प्रतिष्ठित एनएमआयएमएस विद्यापीठातून अभियांत्रिकी विषयात पीएचडी पदवी संपादन करून उरण, रायगड परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे. मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या पदवीदान समारंभात त्यांना अभियांत्रिकी विषयातील पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.




या समारंभास प्रमुख पाहुण्या म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे उपस्थित होत्या. मोहम्मद आमिर शेख सध्या पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील इलेक्ट्रिकल अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापन आणि संशोधन क्षेत्रात त्यांनी सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेतली जात असून पीएचडी पदवी संपादन करणे ही त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे.

उरण, रायगड परिसरातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण व संशोधनाच्या क्षेत्रात त्यांची ही कामगिरी प्रेरणादायी ठरणार आहे. उरण परिसरातील एका तरुणाने अभियांत्रिकी क्षेत्रात पीएचडीसारखी उच्च शैक्षणिक पात्रता प्राप्त करणे ही अभिमानास्पद बाब असून त्यांच्या या यशामुळे उरणच्या शैक्षणिक क्षेत्राच्या लौकिकात भर पडली आहे.

# स्नेहल पाटील 'संगीत अलंकार'मध्ये देशात प्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

संतांच्या अभंगातून उमटणारा भक्तीचा स्वर आणि गुरूंच्या संस्कारातून घडणारी साधना यांचा सुंदर संगम साधत स्नेहल सुनील पाटील हिने 'संगीत अलंकार' परीक्षेत देशात प्रथम क्रमांक पटकावत अभिमानास्पद यश संपादन केले आहे.





स्नेहलच्या या यशामागे केवळ तिची प्रतिभा नसून अनेक वर्षांची अखंड संगीतसाधना, गुरूंचे आशीर्वाद आणि संतपरंपरेतून मिळालेली भक्तीची शिकवण आहे. तिच्या संगीत प्रवासाची सुरुवात २०१५मध्ये भजनसम्राट जनार्दन पारगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. बालवयातच भजन आणि संगीताचे सूर तिच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले. तब्बल चार वर्षे स्नेहलला जनार्दन पारगावकर यांचे मार्गदर्शन लाभले. या काळात तिने केवळ संगीताचे धडे घेतले नाहीत, तर 'सुरांमध्ये साधना आणि साधनेत संस्कार' हा विचारही आत्मसात केला.

संगीताची शिस्त, रियाजाची निष्ठा आणि पायाभूत ज्ञान याच काळात तिच्या मनात रुजले. पुढील संगीत प्रवासात याच संस्कारांनी तिला भक्कम आधार दिला. संतपरंपरेत संगीताला केवळ मनोरंजनाचे साधन मानले गेले नाही, तर ते ईश्वराशी संवाद साधण्याचे माध्यम मानले गेले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांच्या अभंगवाणीतून भक्तीचे सूर महाराष्ट्राच्या मातीशी एकरूप झाले. त्याच वारकरी आणि भजनपरंपरेतील संस्कारांचा वारसा पुढे नेत स्नेहलने शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद ठरत आहे.

आज देशभरातील परीक्षार्थींमध्ये प्रथम क्रमांक मिळवताना स्नेहलच्या सुरांनी जणू तिच्या गुरूंच्या आठवणींनाही आदरांजली वाहिली आहे. गुरूंनी दिलेला स्वर, साधनेने दिलेली दिशा आणि संतपरंपरेने दिलेली भक्ती या त्रिवेणी संगमातून स्नेहलच्या यशाची सुरेल कहाणी आकाराला आली असून ज्या गुरूंच्या चरणी तिने संगीताची पहिली अक्षरे गिरवली, त्यांच्याच संस्कारांचे हे यशस्वी फलित असल्याची भावना तिच्या कुटुंबीयांसह संगीतप्रेमींमध्ये व्यक्त होत आहे.

# रायगड जिल्ह्यात प्रारुप मतदार यादीनुसार १९ लाख ५० हजार मतदार

## अंतिम यादी ४ नोव्हेंबरला



**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची अर्थात एसआयआर मोहीम निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या प्रारुप मतदार यादी नुसार रायगड जिल्ह्यातील वगळली जाणारी (अनकलेक्टेबल) मतदार संख्या ५ लाख ८४ हजार ११८ आहे.दरम्यान ३१ ऑगस्ट रोजी निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप यादीत रायगड जिल्ह्याचे एकुण मतदार १९ लाख ४९हजार ६२१ असून त्यामध्ये ९ लाख ८४ हजार ३१२ पूरुष, ९ लाख ६५ हजार २७४ महिला आणि ३५ तृतीय पंथी मतदार आहेत.

या सर्व अनकलेक्टेबल मतदारांची नावे आपोआप मतदार यादीतून वगळली जातील असे नाही. मात्र, ज्यांचे फॉर्म उपलब्ध नाहीत, ज्यांच्या नोंदींमध्ये विसंगती आहेत किंवा ज्यांचे २००२ च्या मतदार यादीशी आवश्यक लिंकज सिद्ध होत नाही, अशा मतदारांसमोर पुढील टप्प्यात आपली पात्रता सिद्ध करण्याचे आव्हान आहे.'वगळली जाणारी नावे' म्हणजे फॉर्म उपलब्ध न झालेला किंवा संकलित न झालेला मतदार, आणि त्यानंतरच्या पुनरावलोकन, दावे-हरकती व सुनावणी प्रक्रियेत अंतिम निर्णय होणार आहे. या बाबतच्या हरकती ,दावे या बाबतची निर्णय ३१ ऑगस्ट २०२६ ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पुर्ण करण्यात येईल. ही कार्यवाही पूर्ण झाल्या नंतर निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येतील.

मुंबई महानगर प्रदेशातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये अनकलेक्टेबले मतदारांचे प्रमाण राज्याच्या सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. यामागे स्थलांतरित लोकसंख्या, भाडेकरू नागरिक, वारंवार बदलणारे पत्ते, झोपडपट्टी आणि अनधिकृत वस्त्यांमधील निवास नोंदी, तसेच एका शहरात राहून दुसऱ्या ठिकाणी मतदार म्हणून नोंद असण्यासारखे घटक कारणीभूत असू शकतात.

# माणगावात रंगणार 'आम्ही माणगावकर' दहीहंडी उत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर माणगाव शहरात 'आम्ही माणगावकर दहीहंडी उत्सव २०२६' उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवाचे औचित्य साधून लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'वेशभूषा स्पर्धा २०२६' आयोजित करण्यात आली असून, या स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी पटेल बिल्डिंग, निजामपूर रोड, माणगाव येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दहीहंडीच्या पारंपरिक उत्साहासोबतच मुलांच्या कल्पकतेला, आत्मविश्वासाला आणि कलात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे.

आजच्या डिजिटल युगात मुलांच्या हातातील मोबाईल आणि स्क्रीनचा वाढता प्रभाव लक्षात घेता, त्यांना आपल्या भारतीय संस्कृती, परंपरा आणि ऐतिहासिक वारशाशी जोडणारे उपक्रम अधिक महत्त्वाचे ठरत आहेत. श्रीकृष्ण, राधा, विविध देव-देवता, छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यसैनिक, सैनिक, सामाजिक व्यक्तिमत्त्वे तसेच विविध पारंपरिक व्यक्तिरेखांच्या वेशभूषेत सहभागी होण्याची संधी या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना मिळणार आहे.



दोन गटांत होणार स्पर्धा

वेशभूषा स्पर्धेसाठी दोन गट करण्यात आले आहेत. गट १ : १२ वर्षांखालील आणि गट २ : १२ वर्षांवरील विद्यार्थी अशा स्वरूपात स्पर्धा होणार आहे. १२ वर्षांखालील गटासाठी प्रथम क्रमांकास ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ३ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास २ हजार रुपये अशी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.तर १२ वर्षांवरील गटासाठी प्रथम क्रमांकास ७ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास ५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकास ३ हजार रुपये अशी पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये या स्पर्धेबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, पालकांनीही आपल्या मुलांना प्रोत्साहन देत त्यांचा सहभाग निश्चित करावा, असे आयोजकांनी म्हटले आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःच्या वेशभूषेत उपस्थित राहणे अपेक्षित आहे. प्रत्येक सहभागीला आपल्या पात्राविषयी १ ते २ मिनिटे बोलणे किंवा नृत्य सादर करणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ आकर्षक वेशभूषा करण्याचीच नव्हे, तर त्या व्यक्तिरेखेचा परिचय करून घेऊन तो आत्मविश्वासाने सादर करण्याची संधी मिळणार आहे.

मुलांनी कोणती भूमिका निवडायची, तिची वेशभूषा कशी करायची आणि ती रंगमंचावर कशी सादर करायची, यासाठी पालकांनीही मुलांना मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली नावे २ सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदवावीत, असे आयोजकांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी ९२७२३०६२७७ / ७०४५२१४९३३ या क्रमांकांवर संपर्क साधता येणार आहे.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग, आरोपीला अटक


**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वहूर या गावातील एक तरुण हा अल्पवयीन मुलीचा वारंवार पाठलाग करून तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करीत होता. याप्रकरणी पीडित कडून तक्रार दाखल झाली असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मुंबई गोवा महामार्ग लगत असणाऱ्या वहूर गावातील अम्मार नसीम इसाने वय ३२ हा वेळोवेळी पीडित अल्पवयीन मुलगी हीचा मोटर सायकलवरुन पाठलाग करत अश्लील हावभाव करत, डाव्या हाताने स्पर्श करून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व तिचा विनयभंग केला. सदर पीडित मुलगीही अल्पवयीन असल्याने याप्रकरणी दिनांक २९ ऑगस्ट रोजी रात्री नऊ वाजता संबंधित पीडित अल्पवयीन मुलीने महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

दरम्यान महाड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७९, ७८(१), ७५(१), बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८व १२ प्रमाणे, जुने कलम भादवी कलम ५०९, ३५४ ड,३५४ अ, अन्वये आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे. या अल्पवयीन मुलीवरती झालेल्या या लैंगिक अत्याचार प्रकरणी नागरिकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला असून, याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्या राऊत या अधिक तपास करीत आहेत.

# सह्याद्रीच्या कोंढाणा लेणीत ५९ जणांचा अभ्यास ट्रेक



**नेरळ : प्रतिनिधी**

पाठ्यपुस्तकातील इतिहास प्रत्यक्ष अनुभवातून शिकवण्याचा अनोखा उपक्रम शिवशंभो युवा हायकर्स, कर्जत यांनी राबवला. रविवारी (३० ऑगस्ट) आयोजित कोंढाणा लेणी ऐतिहासिक अभ्यास सहल व ट्रेकमध्ये ५९ विद्यार्थी, पालक आणि ट्रेकर्स सहभागी होत सह्याद्रीच्या कुशीत इतिहासाचा जिवंत धडा अनुभवला. ट्रेकची सुरुवात सुनिल देशमुख यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून झाली. "जय भवानी, जय शिवाजी" आणि "हर हर महादेव"च्या जयघोषांनी कोंढाणा परिसर दुमदुमून गेला.

या अभ्यास सहलीचे प्रमुख आकर्षण ठरले दहिवलीचे इतिहास संशोधक व पुरातत्त्वज्ञ सागर माधुरी मधुकर सुर्वे यांचे मार्गदर्शन. त्यांनी सह्याद्रीचा भूगोल, प्राचीन व्यापारी मार्ग, सातवाहनकालीन लेणी संस्कृती, ब्राह्मी शिलालेखांचे प्रत्यक्ष वाचन आणि लेणीतील शिल्पकलेचे अभ्यासपूर्ण विश्लेषण करून विद्यार्थ्यांना इतिहासाची वेगळी ओळख करून दिली. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत अनेक ऐतिहासिक शंकांचे निरसन केले. पालकांनीही अशा अभ्यास सहलींमुळे मुलांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण होत असल्याचे सांगत संस्थेचे कौतुक केले.

यावेळी सागर सुर्वे यांचा संघटनेचे अध्यक्ष विकास चित्ते व उपखजिनदार महेंद्र कर्वे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सचिव शैलेश सातपुते यांच्यासह संस्थेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# करिअर कट्ट्यातून विद्यार्थ्यांना 'एआय'ची नवी दिशा; विविध संधींबाबत मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'AI' हे शिक्षण, संशोधन आणि करिअरचे प्रभावी साधन बनत आहे. या बदलत्या तंत्रज्ञानाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, त्याचा अभ्यासासाठी योग्य वापर करता यावा आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी आवश्यक डिजिटल कौशल्ये विकसित व्हावीत, या उद्देशाने माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्तेवर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत AIच्या बदलत्या विश्वाची माहिती जाणून घेतली.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रम सुरू असून, त्याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध मार्गदर्शनपर उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेली ही AI कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरली.

या उपक्रमासाठी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजीव साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयशंकर पांडे, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य आणि करिअर कट्टा समन्वयक डॉ. बबन सिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेचे नियोजन करण्यात आले.

कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. सरजील सतवारे (वेदक इंजिनिअरिंग कॉलेज, तळा) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सध्याचे युग हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे असल्याचे स्पष्ट केले. AIचा योग्य आणि जबाबदार वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला अधिक परिणामकारक बनविता येते, तसेच संशोधन, कौशल्य विकास आणि करिअर नियोजनालाही त्याची मोठी मदत होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये AIचा उपयोग अभ्यास अधिक प्रभावी करण्यासाठी, माहितीचे विश्लेषण करण्यासाठी, संशोधनासाठी, नवीन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आणि विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी कसा करता येतो, याची त्यांनी विद्यार्थ्यांना उदाहरणांसह माहिती दिली.



AIच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक मदतच नव्हे, तर भविष्यातील करिअरच्या दृष्टीनेही अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. स्पर्धा परीक्षांची तयारी, माहितीचे संकलन, विषयांचा अभ्यास, डिजिटल कौशल्ये, संशोधनाची दिशा आणि करिअरची निवड यासाठी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर कसा करता येईल, याबाबत प्रा. सतवारे यांनी मार्गदर्शन केले.कमी वेळेत अधिक परिणामकारक पद्धतीने शिकणे, नवीन कौशल्ये विकसित करणे आणि भविष्यातील स्पर्धात्मक वातावरणासाठी स्वतःला तयार करणे यासाठी विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाची भीती न बाळगता त्याचा जबाबदारीने, सर्जनशीलतेने आणि योग्य पद्धतीने वापर करण्याचे कौशल्य आत्मसात करावे, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना AIच्या वाढत्या प्रभावाची आणि भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील त्याच्या भूमिकेची जाणीव झाली. पारंपरिक शिक्षणासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालणे ही काळाची गरज असून, अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आत्मविश्वास मिळतो.करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पदवीपुरते शिक्षण न देता कौशल्याधारित, रोजगाराभिमुख आणि भविष्योन्मुख शिक्षणाची दिशा देण्याचा प्रयत्न होत असल्याचे या कार्यशाळेतून अधोरेखित झाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी करिअर संसदेमधील विद्यार्थी मुख्यमंत्री प्रेम तळकर, शर्वरी भोनकर, अमृता अंबाडी, महाविद्यालयीन समन्वयक प्रा. आदिल बडे, तसेच करिअर कट्टा समितीतील प्रा. श्रावणी बक्कम आणि प्रा. साक्षी साठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पिगोंडे ग्रामपंचायत तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी अनिल पाटील

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळील पिगोंडे ग्रामपंचायतीची ग्रामसभा सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात झाली. या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी वेलशेत गावचे माजी गावाध्यक्ष अनिल नारायण पाटील यांची ग्रामस्थांच्या एकमताने निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष अनिल पाटील यांचे उपस्थित ग्रामस्थांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना पाटील यांनी गावातील वाद-विवाद, भांडणे व तंटे संवाद व सामोपचाराच्या माध्यमातून सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. गावामध्ये शांतता, सलोखा, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

या ग्रामसभेस प्रशासक अध्यक्ष संदीप कुलम, सचिव कमलाकर लेंडी, माजी सरपंच संतोषभाई कोळी, माजी तंटामुक्त अध्यक्ष बळीराम बडे, माजी उपसरपंच सखाराम घासे, गंगाराम मिणमिने, कांचनताई माळी, राजेंद्र लवटे, रोशन पारंगे, विठोबा माळी, सुमित पाटील, अंकुश ताडकर, कृष्णा बावकर, शांताराम माळी, मनोज पारंगे, गंगाराम पारंगे, नथुराम माळी, मंगेश पाटील, यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# बल्लाळेश्वर देवस्थान आणि रुधिरसेतू संस्थेतर्फे पाली येथे रक्तदान शिबिर

## ७७ रक्तदात्यांचे योगदान

**पाली : प्रतिनिधी**

श्री बल्लाळेश्वर देवस्थान-पाली व रुधिरसेतू सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा आणि भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. रविवारी (ता. ३०) भक्त निवास क्रमांक २ येथे या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमात एकूण ७७ जणांनी उत्साहाने रक्तदान केले.

सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पाली परिसरातील ग्रामस्थ, युवक तसेच बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या अनेक भाविकांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केले.



विशेष बाब म्हणजे तालुक्यातील आसानवाडी शाळेचे शिक्षक गोरख आघाव यांनी यावेळी आपले ४४ वे रक्तदान करून रक्तदान करण्याबाबत जनजागृती केली.

या प्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे आणि उपाध्यक्ष वैभव मोहन आपटे उपस्थित होते. या दोघांनी स्वतः रक्तदान केले. तसेच विश्वस्त प्रमोद जगन्नाथ पावगी, विश्वस्त अरुण दत्तात्रय गद्रे, विश्वस्त विश्वास विद्याधर गद्रे, विश्वस्त अमोल अशोक साठे आणि विश्वस्त डॉ. पिनाकिन सदानंद कुंटे यांनी उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

यावेळी व्यवस्थापक चंद्रशेखर (शेखर) सोमण व सह व्यवस्थापक पद्माकर फाटक यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी देवस्थानचे विश्वस्त, रुधिरसेतू सेवा संस्थेचे सदस्य, डॉक्टर्स, कर्मचारी आणि वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले.

# ईस्ट झोनची फायनलमध्ये धडक

## दुलिप ट्रॉफीमध्ये सेंट्रल झोनचा पराभव

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

ईशान किशनच्या नेतृत्वाखालील ईस्ट झोन संघाने रजत पाटीदारच्या नेतृत्वाखालील गतविजेत्या सेंट्रल झोनचा पराभव करत दुलीप ट्रॉफीच्या फायनलमध्ये धडक मारली आहे. १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या धमाकेदार कामगिरीसोबतच माफक लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार ईशान किशनने मैदानात उतरून संघाच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गोलंदाजीत मोहम्मद शमी आणि मुकेश कुमार यांनीही दमदार कामगिरी नोंदवली.



बंगळुरूच्या मैदानातील या उपांत्य सामन्यात सेंट्रल झोनने पहिल्या डावात २६६ धावा केल्या होत्या. वैभव सूर्यवंशी आणि अभिमन्यू ईश्वरन यांच्या धमाकेदार अर्धशतकाच्या जोरावर ईस्ट झोनच्या संघानेही तेवढ्याच धावा केल्या. दुसऱ्या डावात सेंट्रल झोनचा डाव १५८ धावांमध्ये गडगडला. हे आव्हान ईस्ट झोनने चार गडी राखून पार केले.

वैभव सूर्यवंशीने पहिल्या डावात ९२ धावांची धमाकेदार खेळी केली. या स्पर्धेत सर्वात कमी वयात अर्धशतक झळकवण्याचा विक्रम त्याने आपल्या नावे केला. दुसऱ्या डावात तो ४० धावांवर बाद झाला. वंडरबॉयने मोठा पराक्रम केला असला तरी या सामन्याचा खरा हिरो ठरला तो मुकेश कुमार. त्याने दोन्ही डावात मिळून सात विकेट्स घेत सामनावीर पुरस्कार पटकवला. शमीनेही दोन डावात पाच विकेट्स घेत करत त्याला उत्तम साथ दिली.

प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ईशान किशनचा कर्णधार म्हणून रेकॉर्ड एकदम खास राहिला आहे. तो अद्याप अपराजित कर्णधार आहे. दुलीप ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत विजय मिळवत त्याने आपला हा दमदार रेकॉर्ड कायम ठेवला आहे. आता २०१२-१३नंतर तब्बल १३ वर्षांनी ईस्ट झोनला दुलीप ट्रॉफीचे जेतेपद मिळवून देण्याचे त्याचे लक्ष्य असेल.

## पहिलीवहिली वूमन्स चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा भारतात होणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पुरुषांप्रमाणे महिलांसाठी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा आयोजित करण्याचे आयसीसीने ठरवले. पुढच्या वर्षी म्हणजे २०२७मध्ये श्रीलंकेत पहिलीवहिली वूमन्स चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा होणार होती, मात्र श्रीलंकेने आयोजनाचा अधिकार गमावला आहे. आता स्पर्धेचे आयोजन भारतात होण्याची चिन्हे आहेत.

या स्पर्धेत आयसीसी क्रमवारीत अव्वल पाच संघ असणार होते. यजमान या नात्याने श्रीलंकेला सहभागाची संधी मिळणार होती, मात्र आयोजनाचा अधिकार गमावल्याने श्रीलंकेचा सहभागही अनिश्चित झाला आहे. श्रीलंकेचा संघ तूर्तास क्रमवारीत सातव्या स्थानी आहे. या सर्व घडामोडींमुळे महिलांचा हा 'मिनी वर्ल्डकप' भारतात रंगण्याची शक्यता आहे.

# अफगाणिस्तानविरुद्ध टी-२० मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर

## संजू सॅमसनचे पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा टी-२० संघ पुढील महिन्यात अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयने १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली आहे. झिम्बावेविरुद्ध टी-२० मालिकेसाठी संजू सॅमसनला भारताच्या संघातून वगळण्यात आले होते. आता आगामी मालिकेसाठी त्याला पुन्हा संधी देण्यात आली आहे.

भारतीय संघ घरच्या मैदानावर या मालिकेसाठी पाहुणा संघ असणार आहे. अफगाणिस्तान संघाकडे या मालिकेचे यजमानपद आहे आणि मालिकेतील तिन्ही सामने दिल्लीत खेळवले जातील. भारतीय संघाची धुरा श्रेयस अय्यरच्या खांद्यावर असणार आहे, तर तिलक वर्माकडे उपकर्णधारपद आहे. निवडकर्त्यांनी संजू सॅमसन आणि इशान किशन या दोन्ही यष्टिरक्षक-फलंदाजांना संघात कायम ठेवले आहे.



१५ सदस्यांच्या या संघात चार प्रमुख खेळाडूंची निवड ही त्यांच्या तंदुरुस्तीच्या अटीवर करण्यात आली आहे; तंदुरुस्तीबाबतची मंजुरी मिळाल्यानंतरच या मालिकेत त्यांचा सहभाग निश्चित केला जाईल. या चार खेळाडूंमध्ये वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डी, फिरकी गोलंदाज व अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर आणि वेगवान गोलंदाज हर्षित राणा यांचा समावेश आहे. हे चौघेही सध्या दुखापतींशी झुंज देत आहेत, त्यामुळे त्यांच्या सहभागाबाबतचा निर्णय ऐनवेळी घेतला जाईल.

**संघ** : श्रेयस अय्यर (कर्णधार), तिलक वर्मा (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, संजू सॅमसन व इशान किशन (विकेटकीपर), शिवम दुबे, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, हर्षित राणा.

# स्मृतीने सुझी बेट्सला टाकले मागे




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला आशिया कप स्पर्धेतील थायलंडविरुद्धच्या सामन्यात स्मृती मानधना हिने छोट्याखानी खेळीसह मोठा डाव साधला आहे. महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारी ती दुसरी फलंदाज ठरली आहे. सांगलीकर डावखुऱ्या बॅटरने न्यूझीलंडची दिग्गज क्रिकेटपटू सुझी बेट्सला मागे टाकले.

दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात स्मृती मानधनाने १० चेंडूत १९ धावा केल्या.तिसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर दुसरी धाव घेण्याच्या प्रयत्नात ती धावबाद झाली. या सामन्यात चौकारासह खाते उघडत तिने सुझी बेट्सला मागे टाकले. याआधी सुझी बेट्स १०७४० धावांसह महिला क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या बॅटरच्या यादीत दुसऱ्या स्थानावर होती.

महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये स्मृती मानधनाच्या पुढे फक्त भारताची माजी कर्णधार मिताली राज आहे. मितालीने आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १०,८६८ धावा केल्या आहेत. यात कसोटीतील ६९९, एकदिवसीय सामन्यांतील ७,८०५ आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांतील २,३६४ धावांचा समावेश आहे. स्मृती मानधनाने कसोटीत ७८८, वनडेमध्ये ५,४११ आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४,६५७ धावा केल्या असून १०७५६ धावांसह ती दुसऱ्या स्थानी आहे. मितालीला मागे टाकत अव्वल होण्यासाठी तिला आणखी ११३ धावांची गरज आहे. आशिया कप स्पर्धेतील दोन मोठ्या खेळीसह तो हा विश्वविक्रम नोंदवू शकते.



## अजिंक्य रहाणेने घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

हल्लीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारणारा भारताचा माजी क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी त्याची पत्नी राधिका हीदेखील सोबत उपस्थित होती.

शैलीदार आणि तंत्रशुद्ध फलंदाजी तसेच कुशल नेतृत्वाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारा भारताचा क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे याने ३० जुलै रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्याने मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी जात त्यांची भेट घेतली. अजिंक्यचे ही सदिच्छा भेट असल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# पाकिस्तान कसोटी संघातून सात खेळाडूंना वगळले

## हेड कोच, बॉलिंग कोचचीही हाकालपट्टी

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर असून कसोटी मालिका संघाने गमावली आहे. इंग्लंडने सुरूवातीचे दोन्ही कसोटी सामने जिंकत मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. आता या मालिकेतील तिसरा आणि अखेरचा कसोटी सामना खेळवला जाणार आहे. त्याआधी पाकिस्तान संघात पुढील सामन्यासाठी तब्बल सात बदल करण्यात आले आहेत, याशिवाय मुख्य प्रशिक्षक व गोलंदाजी प्रशिक्षकांची हकालपट्टी करण्यात आली आहे.

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत पाकिस्तानच्या निराशाजनक कामगिरीनंतर संघ व्यवस्थापनाने एक मोठा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानने तिसऱ्या आणि अंतिम कसोटीपूर्वी सात खेळाडूंना संघातून रिलीज केले आहे. यामध्ये मोहम्मद रिझवान, इमाम-उल-हक, सलमान आघा, अली उस्मान, आमीर जमाल, ओवेस झफर



आणि खुर्रम शहजाद यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षक सर्फराज अहमद आणि गोलंदाजी प्रशिक्षक उमर गुल यांना त्यांच्या पदावरून हटवण्यात आले आहे.

पाक संघात एकूण सात नवीन खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये पाच खेळाडू असे आहेत ज्यांनी यापूर्वी कसोटी सामनाच खेळलेला नाही. सैम अय्युब आणि अब्दुल्ला फझल या दोघांना कसोटी क्रिकेटचा अनुभव अत्यंत मर्यादित आहे, तर पाच नवीन खेळाडूंमध्ये अराफत मिन्हास, मोहम्मद इम्रान ज्युनियर, साद बेग, मोहम्मद इम्रान रंधावा आणि रझाउल्ला यांचा समावेश आहे. यापैकी कोणीही अद्याप पाकिस्तानसाठी कसोटी क्रिकेट खेळलेले नाही.

पाकिस्तानने आपल्या कोचिंग स्टाफमध्येही महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. टी-२० आणि वनडे संघांचे मुख्य प्रशिक्षक माईक हेसन आता कसोटी संघासोबत काम करतील. त्यांच्यासह 'व्हाईट-बॉल' संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक ॲशली नॉफके यांचाही कसोटी संघाच्या कोचिंग स्टाफमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सलग दोन सामने गमावल्यामुळे पाकिस्तानने ही मालिका आधीच गमावली असून आता अंतिम सामन्यात आपली प्रतिष्ठा सावरण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. तिसरी आणि अंतिम कसोटी ९ सप्टेंबरपासून एजबॅस्टन येथे खेळवली जाणार आहे.

## बेन स्टोक्स बिग बॅश लीगमध्ये खेळणार

**लंडन** : इंग्लंडचा माजी कर्णधार आणि अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्स आता ऑस्ट्रेलियात खेळताना दिसणार आहे. आयपीएलच्या धर्तीवर ऑस्ट्रेलियात होणाऱ्या बिग बॅश स्पर्धेतील ॲडलेड स्ट्रायकर्स संघाने स्टोक्सला ताफ्यात समाविष्ट केले आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाल्यामुळे स्टोक्स संपूर्ण हंगामासाठी उपलब्ध असेल. बिग बॅश स्पर्धेत फ्रँचाइजींना खेळाडूंना थेट करारबद्ध नवीन पद्धती लागू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत करारबद्ध होणारा स्टोक्स पहिलाच खेळाडू आहे. स्टोक्सला संघात घेण्यासाठी बिग बॅश स्पर्धेतील अनेक संघ उत्सुक होते, पण ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार टीम पेनच्या नेतृत्वात खेळणाऱ्या स्ट्रायकर्स संघाने स्टोक्ससाठी पुढाकार घेतला.

# मुंबईची धुरा सिद्धेश लाडकडे | रणजी ट्रॉफीसाठी एमसीएचा मोठा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी रणजी ट्रॉफी २०२६-२७ स्पर्धा सुरू होण्याआधी मुंबई क्रिकेट असोसिएशनने मोठा निर्णय घेतला आहे. अजिंक्य रहाणेने कर्णधारपद सोडल्यानंतर मुंबईच्या रणजी संघाची जबाबदारी शार्दुल ठाकूरकडे सोपवण्यात आली होती. आता शार्दुलला कर्णधारपदावरून हटविण्यात आले असून संघाची धुरा सिद्धेश लाडकडे सोपवण्यात आली आहे.

माध्यमातील वृत्तानुसार वर्कलोड मॅनेजमेंटमुळे शार्दुलला कर्णधारपदावरून काढून टाकण्यात आले आहे, पण तो संघाचा भाग असणार आहे. गेल्या हंगामातही शार्दुलच्या अनुपस्थितीत सिद्धेश लाडने



संघाचे नेतृत्व केले होते. यावेळी तो पूर्णवेळ कर्णधाराच्या भूमिकेत असणार आहे.

गेल्या हंगामात मुंबईचा संघ हवी तशी कामगिरी करू शकला नव्हता. मुंबईला घरच्या मैदानावर खेळताना जम्मू-काश्मीर संघाकडून पराभवाचा सामना करावा लागला, तर क्वार्टर फायनलमधून बाहेर व्हावे लागले, पण फलंदाजीत सिद्धेश लाड चमकला होता. त्याने आठ सामन्यांमध्ये ७७.४०च्या सरासरीने ७७४ धावा केल्या होत्या. यादरम्यान त्याने पाच शतके आणि एक अर्धशतक झळकावले होते.

आगामी हंगामात मुंबईचा संघ साखळी फेरीतील १० सामने खेळणार आहे. पहिला सामना ११ ऑक्टोबरला चंदीगड संघाविरुद्ध होणार आहे.

सिद्धेश लाड हा देशांतर्गत क्रिकेटमधील सर्वात विश्वासू फलंदाजांपैकी एक आहे. मुंबईसाठी त्याने प्रथम श्रेणी, लिस्ट ए क्रिकेट आणि टी-२० क्रिकेटमध्ये मिळून आठ हजारांहून अधिक धावा केल्या आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याने एकूण ५६२३ धावा केल्या आहेत. यादरम्यान गोलंदाजी करताना आठ गडीदेखील बाद केले आहेत. लिस्ट ए क्रिकेटमधील ५६ सामन्यांमध्ये त्याने १५७१ धावा केल्या आहेत, तर टी-२० क्रिकेटमधील ६१ सामन्यांमध्ये त्याने ९४४ धावा केल्या आहेत.



## हार्दिक पांड्या अनफिटच!

### अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेला मुकणार

**बंगळुरू** : अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेला सुरुवात होण्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. गेल्या काही महिन्यांपासून संघाबाहेर असलेला हार्दिक पांड्या अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. यामुळे त्याचे पुनरागमन आणखी लांबणीवर गेले आहे.

हार्दिक पांड्या सध्या बंगळुरूतील सेंटर ऑफ एक्सिलेंसमध्ये आपल्या फिटनेसवर मेहनत घेत आहे. यादरम्यान त्याच्या पायाला दुखापत झाली. त्यामुळे त्याला पुनरागमन करण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागू शकते. तो जोपर्यंत फिट होणार नाही, तोपर्यंत त्याला खेळण्याची अनुमती दिली जाणार नाही. भारत आणि अफगाणिस्तान संघांमध्ये तीन टी-२० सामन्यांची मालिका १३ सप्टेंबरपासून खेळवली जाणार आहे.

## केपीएलमध्ये अर्जुनचा निर्णायक षटकार

**तिरूवनंतपूरम** : केरळ प्रीमियर लीगमध्ये झालेल्या कॅलिकट ग्लोबस्टार्सविरुद्धच्या सामन्यात थ्रिसूर टायटन्स संघाच्या ए.के. अर्जुनने शेवटच्या चेंडूवर चार धावांची गरज असताना खणखणीत षटकार खेचला आणि आपल्या संघाला विजय मिळवून दिला. विशेष म्हणजे त्याला नीट चालताही येत नव्हते.

कॅलिकट संघाने निधारित २० षटकांत पाच बाद १४६ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना थ्रिसूर संघाचा कर्णधार एम.एस. अखिलने दमदार खेळी करून विजय खेचून आणला. शेवटच्या चेंडूवर विजयासाठी चार धावांची गरज होती. त्यावेळी फलंदाजी करण्यासाठी अर्जुन फलंदाजीला आला. त्याला नीट चालताही येत नव्हते, पण संघासाठी तो लंगडत खेळपट्टीवर आला आणि शेवटच्या चेंडूवर खणखणीत षटकार खेचून त्याने संघाला विजय मिळवून दिला.

## पुजाराच्या टीममधून रोहित, धोनी, रहाणे गायब!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी क्रिकेटपटू चेतेश्वर पुजाराने आपली ऑल टाईम ग्रेट प्लेईंग ११ निवडली आहे. या प्लेईंग ११मधून रोहित शर्मा, अजिंक्य रहाणे आणि एमएस धोनीसारख्या खेळाडूंना संघाबाहेर ठेवले आहे.



क्रिकइन्फोने शेअर केलेल्या एका व्हिडीओमध्ये पुजाराने आपल्या आवडत्या ११ खेळाडूंनी नावे सांगितली आहेत. त्याने सलामीवीर फलंदाज म्हणून राहुल द्रविड आणि वीरेंद्र सेहवाग या दोघांची निवड केली आहे, तर पुजाराने स्वतःला तिसऱ्या क्रमांकावर ठेवले आहे.

भारताचा मास्टर ब्लास्टर फलंदाज सचिन तेंडुलकरला चौथ्या क्रमांकावर आणि भारताचा ऑल टाईम ग्रेट फलंदाज विराट कोहलीला पुजाराने पाचव्या क्रमांकावर ठेवले आहे. व्हीव्हीएस लक्ष्मण सहाव्या क्रमांकावर आहे. पुजाराने यष्टीरक्षक फलंदाज म्हणून महेंद्रसिंह धोनीऐवजी स्टार फलंदाज ऋषभ पंतची निवड केली आहे.

पुजाराने गोलंदाज म्हणून अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा आणि आर अश्विनची निवड केली आहे. वेगवान गोलंदाज म्हणून मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराहची, तर १२वा खेळाडू म्हणून त्याने वेगवान गोलंदाज इशांत शर्माची निवड केली आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com